साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

वर्ष 34 वे

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे

संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे

वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

www.saptahiksandesh.com

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.८ | पाने-२४ | दि.१/३/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रु.







## तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी

# शिवसेना (शिंदे गट) पक्षाने संधी दिली तर विधानसभा लढवणार- महेश चिवटे



करमाळा : तालुक्यात असलेल्या गटा-तटाच्या राजकारणामुळे करमाळा तालुक्याचा सर्वांगीण विकास झाला नाही. आजपर्यंत तालुक्यातील जनतेने पक्षीय राजकारणाला महत्व दिले नाही, त्यामुळे तालुक्यात विकासाचे मोठे प्रकल्प आले नाहीत. तालुक्याचा सर्वांगीण विकास करायचा असेलतर तालुक्याला पक्षीय राजकारणाची गरज आहे तसेच राजकारणात चांगल्या माणसाचीही गरज आहे. त्यामुळे मतदारांना चांगला पर्याय देण्यासाठी शिवसेना (शिंदे गट) पक्षाने संधी दिली तर आपण विधानसभा निवडणूक लढवू; असे प्रतिपादन शिवसेनेचे जिल्हा प्रमुख महेश चिवटे यांनी केले आहे. श्री.चिवटे यांचा येत्या ७ मार्चला असलेल्या वाढदिवसानिमित्त ते सा.कमलाभवानी संदेशशी बोलत होते.

पुढे बोलताना श्री.चिवटे म्हणाले, की तालुक्यातील आपल्या गटाच्या, संस्थेच्या सत्ता अबाधीत ठेवण्यासाठी प्रत्येकजण धडपड करतात, पण तालुक्यातील विकासासाठी सर्वजण का एकत्र येत नाही..? आपल्या तालुक्यात निवडणुकीत पक्ष जवळ करायचा आणि यश मिळाले की पक्षाला सोडून द्यायचे अशी रित आहे. त्यामुळे राजकारण हे व्यक्तीकेंद्रीत झाले आहे. (पान नं.४ वर)

### ७ मार्चला चिवटे यांचा नागरी सत्कार

महेश चिवटे यांच्या वाढदिवसानिमित्त ७ मार्चला सकाळी ११ वाजता खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांचे हस्ते व सांगोला चे आमदार शहाजी पाटील यांचे अध्यक्षतेखाली जाहीर नागरी सत्काराचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. तसेच सकाळी १० ते ५ मोफत आरोग्य शिबीर व चष्मा वाटप होणार आहे. हा कार्यक्रम अमरनाथ टॉवर श्रीदेवीचामाळ रोड, करमाळा येथे संपन्न होणार आहे.



सर्वसामान्यांच्या विकासासाठी केवळ सत्ता महत्वाची नाहीतर दृष्टी व कार्य महत्वाचे आहे..!

संपादकीय.........................................!

# राजकारण..!

अलीकडे राजकारणावर बऱ्याच उलट-सुलट चर्चा सुरू झाल्या आहेत. राजकारण म्हणजे विशिषट लोकांची मक्तेदारी आहे. ज्यांची मक्तेदारी आहे अशांनीच राजकारण करावे व इतरांनी ते फक्त पहावे; असा सर्वत्र गैरसमज आहे. राजकारणात असणाऱ्यांचा व नसणाऱ्यांचा राजकारण हा असा विषय आहे की, जो म्हटलेतरी बाजुला टाकता येत नाही. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या प्रत्येकजण राजकारणाशी जोडलेला असतोच. प्रत्येकाची राजकारणावर काही मते ठरलेली असतात.

आपण राज्य कारभारात सहभाग मिळण्यासाठी ज्या खटपटी केल्या जातात त्याला 'राजकारण' म्हणतो. आपला देश स्वतंत्र नव्हता तेंव्हा देश स्वतंत्र होण्यासाठी जी चळवळ राबवली त्या चळवळीपासून ते स्वातंत्र्यानंतर सत्ता काबीज करण्यासाठी ज्या-ज्या घडामोडी झाल्या त्याची वर्गवारी राजकारणात मोडली जाते. स्वातंत्र्यानंतर राजकारणात सत्ता ही केंद्रस्थानी आली. सत्तेतून व्यक्तीमत्वाचा विकास, आर्थीक उन्नत्ती, आपले हितचिंतक व परिसराचे भवितव्य बदलता येते; हे लक्षात आल्यावर सत्ता मिळवण्यासाठी अनेक मार्ग आखले जावू लागले. त्यामध्ये काही धाडसी तर काही कुटील मार्ग नियाले. दुर्दैवाने या सर्व मार्गाला 'राजकारण' हाच शब्द जोडला आहे. त्यामुळे राजकारण हे पुरते मलीन झाले आहे.

राजकारणात स्थिरावण्यासाठी व सत्ता हस्तगत करण्यासाठी अनेकजण अनेक पर्याय वापरतात. पुर्वी गांधीजी जेंव्हा हा देश स्वतंत्र व्हावा म्हणून झगडत होते, तेंव्हा ते नेते असूनही त्यांनी सर्वसामान्यांची दुरावस्था पाहून अंगावर फक्त पंचा घेतला. दीन, दु:खीतांच्या दारात ते स्वत: गेले. त्यांना कधीही माझ्यावर विश्वास ठेवा.. असे म्हणावे लागले नाही. स्वत:च्या जगण्यातून त्यांनी विश्वास कमवला व टिकवला. अर्थातच यासाठी किंमत चुकवावी लागते. अलीकडे राजकारणाला ओंगळवाणे स्वरूप आले आहे. राजकारण करायचे म्हटलेतर पदरी काही गुंड पाळावे लागतात, स्वत:च्या नावाची दहशत बसवावी लागते, दोन नंबरचे धंदे असावे लागतात. त्यातून कार्यकर्ते पोसले जातात. तेच निवडणुकीवेळी समाजसेवक म्हणून मिरवतात. निवडणुकीच्या काळात मतदारांना सर्व पुरवायचे पैसा, दारू, मटन जे पाहिजे ती व्यक्ती देण्याची परंपरा सुरू झाली. मत मिळवताना सर्वसामान्यांचे पाय धरायचे व सत्ता येताच मतदारांचे पाय ओढायचे हे सुत्र जवळपास सर्वत्र आहे. निवडणुकीत पैसा पेरायचा आणि सत्ता मिळताच त्याच्या चौपट उगवायचा. अनेकांनी राजकारण हा पैसे कमवायचा धंदाच बनवला आहे. राज्यातील व देशातील सत्ताधारी तसेच विरोधी पक्षाच्या उमेदवारांचे उमेवारी अर्जासोबत उत्पन्नाचे प्रतिज्ञापत्र पाहिलेतर लक्षात येते, की गेल्या पाच वर्षापूर्वी नेत्याच्या उत्पन्नात किती वाढ झाली आहे. कोणाची नावे घेण्याची गरज नाही, या लोकप्रतिनिधींचे उमेदवारी अर्जाची माहिती घेतलीतर ते त्वरीत स्पष्ट होते. अनेकांना राजकारण म्हणजे परीसस्पर्श वाटत आहे. राजकारणात आले,की प्रचंड संपत्ती जोडता येते. सहज एक उदाहरण पहायाला हरकत नाही. उत्तरप्रदेशातुन एक फाटक्या कपड्याचा तरूण मुंबईत आला. पोट भरण्यासाठी काम करत असताना, त्याला मुंबई काँग्रेसचे कार्यालय झाडायची नोकरी मिळाली. तिथे काम करत करत तो मोठा झाला आणि तोच थेट मुंबई काँग्रेसचा अध्यक्ष झाला. त्याच्यावर धाड पडली तेंव्हा त्याच्याकडे ३५० कोटी रूपये सापडले. अवघ्या २० ते २५ वर्षातील हा बदल नेमके काय सांगतो.

एका बाजुला लालच दाखवून व दुसऱ्या बाजुला लालच देवून सत्ता हस्तगत करण्याचा प्रकार तर तिसऱ्या बाजुला पोटभर खावून दु:खीतांसमोर आश्रू ढाळायचे. पोपटापेक्षा जास्त पोपटपंची दाखवयाची, गोड-गोड बोलून व खोटी आश्वासने देवून सत्ता काबीज करायची आणि त्यानंतर मतदाराकडे न फिरकणे असेही प्रकार होतात. काही बोलघेवडे लोक केवळ बोलण्याची लकब, सर्वसामान्यात मिसळणे आणि त्यांच्या परिवारातील कार्यक्रमाला हजेरी लावून सत्ता काबीज करतात. काही ठिकाणी भावनिक प्रश्न करून सत्ता हस्तगत केली जाते. काही ठिकाणी स्वत:चा विकास करायचा व त्याच जोरावर सत्ता मिळवायची आणि पुन्हा स्वत:चाच विकास करायचा असेही प्रकार होतात. काहीजण तर वारसहक्काने सत्ता काबीज करून संपत्ती लुटत असतात. काहीजण सर्वसामान्यांची दुर्बलता लक्षात घेऊन त्यांना आपल्याकडील संस्थाचा आधार देवून कायमचे गुलाम बनवतात. वर्षानुवर्षे त्यांच्या मतावर आपली सत्तेची पोळी भाजतात. सत्ता मिळवण्याचे असे एक ना अनेक मार्ग आखून राजकारणात यशस्वी होणारे महाभाग सर्वत्र आहेत.

आपल्या तालुक्यातही सत्ताधाऱ्यांनी ज्या सत्ता मिळवल्या त्या कशा मिळवल्या; याचा थोडा विचार केलातर ते लगेच लक्षात येईल. सत्ता मिळवणे सोपे असते पण ते टिकवणे अवघड असते. मतदारापर्यंत तुमचे कार्य व तुमची तळमळ गेली असेलतरच मतदार कै.गणपतराव देशमुख यांच्याप्रमाणे वयाच्या ८० व्या वर्षीही सत्तास्थानवर बसवतात. तालुक्याच्या सत्तेत अनेकजण आले व गेले असेच चित्र आहे. नशीब एकच की या तालुक्यात दादागीरीला कोणतेही स्थान येथील मतदार देत नाही. अजुनही पैशावर भुलून मतात फारसा फरक झालेला दिसून येत नाही. कै.रावसाहेब पाटील, जयवंतराव जगताप यांची पहिली निवडणूक, कै.दिगंबरराव बागल यांची पहिली निवडणुक पाहिलीतर ही माणसं फार मोठ्या पैशाच्या जोरावर निवडून आलेली नाहीत. ज्या काळात या तालुक्यात उजनीचे पाणी पुरेसे नव्हते, वीज पुरेशी नव्हती, (म्हणजे आज पुरेशी आहे असे नाही) आदिनाथ साखर कारखाना १९९३ ला सुरू झाला, पण ऊसाला भाव मिळत नव्हता, तालुक्यातील तरूण वर्ग फारसा शिकलेला नव्हता, त्या काळात येथील मतदारांनी आपले काम चोख बजावण्याचे काम केले आहे. राज्यात सत्ताकारणासाठी ज्या लबाड्या केल्या जातात, तशा लबाड्या या तालुक्यात फारशा प्रमाणात होत नाही; ही बाब लक्षात घेण्याजोगी आहे.

अलीकडे तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी कोणाचा बांधील राहिलेला नाही. पुर्वी सोसायट्याच्या दबावाचे राजकारण होते ते आता राहिलेले नाही. करमाळा शहराचे राजकारण पूर्वी अर्बन बँकेवर चालायचे; पण गेल्या काही निवडणुकीत तो पॅटर्न मोडीत नियाला आहे. तालुक्यातील अनेक गावा-गावातील युवक सुशिक्षीत असून तालुक्यातील हजारो तरूण उच्चशिक्षीत झाले आहेत. एवढेच नव्हेतर शेकडो तरूण राज्यातीला सन्मानाच्या पदावर सेवेत कार्यरत आहेत. त्यांच्या शब्दावर गावा-गावातील नागरिकांचा विश्वास आहे. त्यांनी ठरवले तर ते आख्खे गावाचे व तालुक्याचे राजकरण सहज बदलू शकतात; अशी ताकदवान युवकांची फळी निर्माण झाली आहे.

एका बाजुला हे सुंदर चित्र असताना तालुक्यातील रस्ते, वीज, शेतीला पाणी, प्यायला पाणी, तरूणांच्या हाताला काम याबाबत आजपर्यंतच्या सत्ताधाऱ्यांची झालेली कुचराई किंबहुना जास्त शिक्षण नसलेल्या व्यक्तीकडे नेतृत्व व सत्ता गेल्यामुळे तालुक्याची पाहिजे तशी प्रगती झाली नाही. निसर्ग सानिध्य लाभुनही त्याचा पाहिजे तसा फायदा उठवला नाही. त्यामुळे सर्वसामान्यांचा सध्याच्या राजकारणात असल्याबद्दल भ्रमनिरास झाला .असे असलेतरी या राजकारणात अजुनही या तालुक्यातील युवक पाहिजे तसा पुढे येत नाही; ही दुर्दैवाची गोष्ट आहे. तालुक्याचा विकास झाला पाहिजे, राजकारण बदलले पाहिजे, भ्रष्ट राजकारणात सुधारणा झाल्या पाहिजे हे तरूणांना मान्य आहे पण हे बदलण्यासाठी राजकारणात स्वत: उतरण्याची तयारी तरूणात नाही ही वस्तुस्थिती आहे. खरंतर हे तालुक्याचे चित्र बदलण्यासाठी व राजकिय पायवाट बदलण्यासाठी गावा-गावातील तरूणांनी सत्ताकारणात पुढे आले पाहिजे. एक ग्रामपंचायत बदलली, सहकारी संस्था बदलल्या, पाणी पुरवठा संस्था कार्यक्षम झाल्या, पंचायत समिती ते जिल्हा परिषद क्षेत्रात बदल झालेतर विकासाचा केंद्रबिंदू गाठायला वेळ लागणार नाही.

आजही सत्तेवर अनेक तरूण दिसतात पण ते तरूण फक्त वयाने तरूण आहेत व विशिष्ट राजकीय दावणीला बांधलेले आहेत. बहुतांशी कुवत नसणाऱ्या व शब्द न ओलंडणाऱ्यांना निवडणुकीत संधी मिळते. जनमाणसात काही करण्याची धमक आहे व तालुका बदलण्याचे स्वप्न ह्यी ज्यांनी बांधले आहे. त्यांनी मोठ्या सत्ताकारणापेक्षा गाव पातळीपासून विकासाचे स्वप्न पाहून राजकारणात आले पाहिजे व खरे राजकारण कशाला म्हणतात ते दाखवून दिले पाहिजे.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)


7 मार्च
सोलापूर जिल्हा नियोजन समितीचे सदस्य, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख
श्री कमलादेवी औद्योगिक वसाहतीचे चेअरमन, पत्रकार संघाचे अध्यक्ष
मा.महेश नरसिंह चिवटे
आपणांस वाढदिवसाच्या लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा !
माजी उपाध्यक्ष, जि.प.सोलापूर
श्री.राजेंद्र बारकुंड
डॉ.भूषण राजेंद्रकुमार बारकुंड
(एम.बी.बी.एस.मुंबई)
युवराज राजेंद्रकुमार बारकुंड
शुभेच्छुक
राजेंद्र बारकुंड मित्र मंडळ करमाळा तालुका


शिवसेना सोलापूर जिल्हाप्रमुख
सोलापूर जिल्हा नियोजन समिती सदस्य
मा.श्री.
महेशशेठ चिवटे
आपणांस ७ मार्च रोजी असलेल्या
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा...
श्री.नागेश वसंत कथले
शुभेच्छुक
शिवम फर्टिलायझर्स अँड हार्डवेअर
जवळा, ता.जामखेड
(प्रोप्रा : नागेश वसंत कथले)


श्री कमलादेवी औद्योगिक वसाहतीचे
चेअरमन व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख
मा.महेश नरसिंह
चिवटे
आपणांस
वाढदिवसाच्या
7 March
हार्दिक शुभेच्छा !
राहुल शिवाजी लखदिवे
अमोल शिवाजी लखदिवे
शुभम राहुल लखदिवे
वेदांत राहुल लखदिवे
शुभेच्छुक
श्री किर्तेश्वर ॲग्रो
केत्तूर नं.२ (पारेवाडी स्टे.), ता.करमाळा
प्रोप्रा : राहुल शिवाजी लखदिवे
(9763278327)
रुद्र अ.लखदिवे

पान १ वरून पुढे...

# शिवसेना (शिंदे गट) पक्षाने संधी दिली तर विधानसभा लढवणार- महेश चिवटे

करमाळा शहरातील टाऊन हॉलसाठी ६ कोटी रूपये मंजूर केले आहेत. नगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीसाठी ५ कोटी रूपये मंजूर झाले आहेत. छत्रपती शिवाजी पुतळ्याच्या सुशोभीकरणासाठी ५० लाख रूपये, नेटके हॉस्पीटल समोरील रस्त्यासाठी ५० लाख रूपये, श्रावणनगर रस्त्यासाठी ४० लाख रूपये, घोलपनगर येथील रस्त्यासाठी ४० लाख रूपये, राशिनपेठ येथील गटार व रस्त्यासाठी ५० लाख रूपये, सिध्दार्थनगर येथील व्यायाम शाळेसाठी २५ लाख रूपये, संभाजी महाराज उद्यानासाठी २० लाख रूपये, श्रावणनगर आनंद दिघे सभागृह अभ्यासिकेसाठी ३० लाख रूपये मंजूर केले आहे. याशिवाय भुयारी गटार योजना व अमृत -२ अंतर्गत वाढीव पाणी पुरवठा योजना व पाणी शुध्दीकरण प्रकल्प यासाठी १६० कोटी रूपयाचा प्रस्ताव मुख्यमंत्र्यांनी मंजूर करून खाली पाठवलेला आहे. याबरोबरच जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून हिवरवाडी गावातील रस्त्यासाठी ५० लाख, जातेगाव ग्रामपंचायतीसाठी १ कोटी २० लाख, कोळगाव रस्ता दुरूस्तीसाठी २५ लाख रूपये मंजूर केले आहेत. त्याबरोबरच मुख्यमंत्री विशेष सहाय्यता निधीतून रस्ते, दलीतवस्ती सुधारणा, आरो प्लॅन्टसाठी पाच कोटी रूपयाचा निधी मंजूर झाला आहे. साधा कार्यकर्ता म्हणून एवढा निधी मिळवला आहे. जर जनतेने पद दिलेतर यापेक्षा कितीतरी मोठे काम करेल.

**...महेश चिवटे**
**(शिवसेना सोलापूर जिल्हाप्रमुख)**

त्यामुळे राजकारण हे व्यक्तीकेंद्रीत झाले आहे. त्यामुळेच आपली प्रगती नाही. याउलट बार्शीचे आमदार राजा राऊत यांनी बार्शी शहरासाठी १७९ कोटी रूपये रस्त्याला मंजूर केले आहेत, पण आपल्याकडे काय..? आहे. अलीकडे सांगोला तालुक्यातही अब्जावधीची कामे झाली; पण येथे योग्य प्रमाणात निधी मिळालेला नाही. तरीही मी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे तसेच मंगेश चिवटे यांच्या सहकार्यातून तालुक्यात विकास निधी आणलेला आहे.

तालुक्यात रोज ७० ते ८० लोक वीजेचे प्रश्न घेऊन येतात. त्यांना न्याय देण्याचे काम आम्ही करतो; मला वाटतं हीच आमची यशाची पावती आहे. याशिवाय आम्हाला प्रस्थापितांच्या विरोधात आंदोलने करावी लागली आहेत. मी स्वत: कधीही पक्ष, गट तट, जात याचा विचारात न करता, आलेल्यांची कामे करतो व ते काम अविरतपणे चालू आहे. जेंव्हा शेटफळ येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा उभारणी संदर्भात प्रशासनाने चुकीची भुमीका घेतली, त्यावेळी तिथे कोणी जात नव्हते. मी स्वत: गेलो, छत्रपतीच्या पुतळ्याचे पुजन केले व ग्रामस्थांच्या पाठीशी उभा राहिलो. करमाळा शहरात ब्लड बँक, डायलेसीस सेंटर सुरू केले. तालुक्यात १३ ठिकाणी वैद्यकिय शिबीरे घेऊन त्यात जवळपास ३५ हजार रूग्णांची तपासणी केली आहे. गरजुंना ७ हजार चष्म्याचे वाटप केले आहे. याबरोबरच मुख्यमंत्री वैद्यकिय कक्षातून २५० रूग्णांना जवळपास १ कोटी १२ लाख रूपये मदत दिलेली आहे. याबरोबरच अनेक रूग्णांच्या बिलात सवलत मिळवून दिली. करमाळा शहरात मोफत ॲम्बुलन्स सेवा सुरू केली आहे. तसेच अनेक रूग्णांना ठाण्याला पाठवून मोफत उपचार मिळवून दिले आहेत. याशिवाय रिटेवाडी उपसा सिंचन योजनेसाठी गेल्या तीन वर्षेपासून पाठपुरावा केला आहे. त्यासाठी ३०० कोटीचे अंदाजपत्रक होत असल्याची माहिती सचिव दिपक कपूर यांनी दिली आहे. याशिवाय एम.आय.डी.सी. मधील प्लॉट वाटप सुरू केले आहे. अनेक उद्योजकांना मोफत मार्गदर्शन देतो. तसेच एम.आय.डी.सी. विकास कामासाठी साडेचार कोटी रूपये मंजूर, त्यातून तिथे डांबरीकरण व पाण्याची सोय केली आहे. एम.आय.डी.सी.च्या अंतर्गत पाईप लाईन चे १ कोटी ९० हजार रूपयाचे टेंडर काढले आहे. लवकरच उदय सामंत यांच्या हस्ते प्लॉटचे वाटप करणार असल्याचेही सोलापूर जिल्हा नियोजन समितीचे सदस्य व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी सांगितले.

विघ्नहर्ता इंटिरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
देवी प्लायवुड ॲन्ड हार्डवेअर
• प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
• हार्डवेअर • फेव्हिकॉल • वुडन फ्लोरिंग • सनमायका
प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

## संत निरंकारी मंडळाच्या वतीने स्वच्छता मोहिम

# संगोबा येथील सीना पात्राची केली स्वच्छता

करमाळा (सं.प्र.) : संत निरंकारी मंडळाच्या वतीने स्वच्छ जल स्वच्छ मन या अभियानांतर्गत संगोबा येथील सीना नदीच्या पात्राची स्वच्छता मोहिम राबविण्यात आली आहे. या स्वच्छता मोहिमेत सीना नदी पात्रातील प्लॅस्टीक कचरा, काटेरी झुडूपे व अन्य बाबी गोळा करून जाळून स्वच्छता केली आहे. संत निरंकारी मंडळाच्या वतीने करमाळा शाखेचे प्रमुख पोपटराव थोरात, सेवादल संचालक रमेश वारे तसेच सौ.वैशाली सरडे, सेवादल शिक्षक भैरू वळेकर, सौ.विजया भुजबळ, मुकूंद साळुंके, डॉ.भाऊसाहेब सरडे यांचेसह नारायण जाधव, आत्माराम वायकुळे, शांताराम होगले, रामभाऊ नाळे या सर्वांनी नियोजन करून संत निरंकारी मंडळाच्या



करमाळा शाखेच्या सर्व सदस्यांच्या वतीने जवळपास २०० जणांनी नदी पात्राची स्वच्छता केली आहे. यावेळी जालिंदर गायकवाड, विनय ननवरे, राजेंद्र गायकवाड, ॲड.शशिकांत नरूटे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
• मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
• जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
• फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
• सुसज्ज ऑपरेशन थिएटर • नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
• लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
• एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमेट्री
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकाशची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स (आमच्याकडे शास्त्रोक्त पध्दतीने बनविलेले अचूक नंबरचे चष्मे अर्जंट बनवून मिळतील)
पत्ता : बँक ऑफ इंडिया समोर, करमाळा. मो.9527268181 / 9860872619

डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
फ्रेश मटेरियलची हमी फक्त एव्हरफ्रेश सुपरमार्ट मध्येच !
जागतिक महिला दिन व महाशिवरात्रीनिमित्त अनेक वस्तूंवर
डिस्काउंट ऑफर
विविध प्रकारामध्ये 'फ्रेश व बेस्ट क्वॉलिटी'चे
उपवासाचे पदार्थ
खजुर । शेंगदाणे । शाबुदाणा । बा.इस्टंट शाबुदाणा । भगर । शेंगतेल
राजगिरा लाडू व वडी । गुळाची शेंगदाणा, मिक्स, पिनट बटर चिक्की
गुलकंद राजगिरा वडी व रोल । तिखट व मीठाचे केळी व बटाटा चिप्स्
तिखट व गोड नायलॉन शाबुदाणा व बटाटा चिवडा । बटाटा चिलीमीली
खारे शेंगदाणे । नारळपाणी गोड शेंगदाणे । उपवास लिंबू लोणचे
उपवासासाठी पीठ
भगर पीठ, शिंगाडा पीठ राजगिरा पीठ उपवास भाजणी इ.
सर्व ब्रॅन्डेड वस्तूंच्या छापील किंमतीवर कमीत कमी 10% डिस्काउंट
तळण्यासाठी...
बटाटा पापड, भगर पापड, बटाटा खीस, स्क्रु बटाटा बॉबी, बटाटा वेफर्स, शाबुदाणा पापडी कच्चा नायलॉन शाबुदाणा, शाबुदाणा बॉबी इ.
सदर कात्रण घेऊन येणाऱ्या ग्राहकांसाठी 390 रू. किंमतीचा
टाटा प्रिमियम चहा १ किलो पॅक डिस्काऊंट दरात फक्त 299 रू. मध्ये
टीप : डिस्काउंट ऑफर, नियम व अटी समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !
॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥
एव्हरफ्रेश सुपरमार्ट
॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥
*नियम व अटी लागू
किराणा । मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुटस् । बिस्कीटस् । नमकीन ॲन्ड स्वीटस् । बेकरी ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस्
नॅचरल प्रॉडक्टस् । पर्सनल, होम ॲन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य
पंढरपूर अर्बन बँके समोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031


7 मार्च
श्री कमलादेवी औद्योगिक
वसाहतीचे चेअरमन व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख
श्री.महेश नरसिंह चिवटे
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
नमो कलेक्शन, मेनरोड, करमाळा.


७ मार्च
करमाळा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष
व शिवसेना जिल्हाप्रमुख
मा.श्री.महेशशेठ चिवटे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
श्री महावीर फर्टिलायझर्स (सोळंकी)
मंगळवारपेठ, करमाळा. (प्रोप्रा : महावीर राजकुमार सोळंकी) मो.९४२३३३४०८९


7 March
इंजि.अनिल पाटील
इंजि.अतुल बनसुडे
शिवसेनेचे जिल्हाप्रमुख
मा.श्री.महेशशेठ चिवटे
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
कमलाई इन्फ्रा
सिंचननगर, बायपास रोड जवळ, करमाळा.
अनिल पाटील B.E.Civil (9423334868) अतुल बनसुडे B.E.Civil (9823090034)


7 March
शिवसेनेचे जिल्हाप्रमुख
मा.महेश नरसिंह चिवटे
आपणांस वाढदिवसाच्या..
हार्दिक शुभेच्छा..
शुभेच्छुक
सम्राट कृषी केंद्र वाशिंबे चौक, राजुरी
प्रोप्रा : सम्राट शरद खानवरे (७०३८९३७००५)
सम्राट खानवरे
ओंकार खानवरे

# रश्मी बागल यांची भाजपा महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष पदी निवड



करमाळा(सं.प्र.) : बागल गटाच्या नेत्या रश्मी बागल-कोलते व युवा नेते दिग्विजय बागल तसेच कार्यकर्त्यांनी मुंबई येथील भाजपाच्या प्रदेश कार्यालयात हजर राहून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे तसेच भाजपाच्या अनेक नेत्यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पार्टी मध्ये प्रवेश केला. बागल गटाच्या प्रवेशानंतर रश्मी बागल यांची भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. ही निवड महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांनी नियुक्तीचे पत्र देऊन केली.

निवडीनंतर रश्मी बागल म्हणाल्या, की भारतीय जनता पार्टी तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना अपेक्षित असलेले भाजपाचे संघटनात्मक कार्य अधिक भक्कम व मजबुत करण्याकरीता प्रदेश महिला मोर्चाच्या माध्यमातून जास्तीत जास्त वेळ देवून चांगल्या प्रकारे काम करू तसेच दिलेली जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडणार असल्याचे सांगितले. या प्रवेश कार्यक्रमास करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती चिंतामणी जगताप, मकाईचे चेअरमन दिनेश भांडवलकर, आदिनाथचे चेअरमन धनंजय डोंगरे, विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, मकाईचे संचालक अमोल यादव, सतीश नीळ, आशिष गायकवाड, अनिल अनारसे, बाजार समितीचे संचालक काशिनाथ काकडे, कलिम काजी, ॲड.नानासाहेब शिंदे, आनंदराव कांबळे, विकास भोसले यांनी देखील उपस्थित राहून भाजपा मध्ये प्रवेश केला.

यावेळी रश्मी बागल यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस यांना करमाळा तालुक्यातील रिटेवाडी उपसासिंचन योजना राबविण्यात यावी; यासाठी विशेष लक्ष द्यावे अशी चिठ्ठी देत मागणी केली. यावर फडणवीस यांनी आपल्या भाषणात या योजनेतील अडचणी दूर करून ही योजना साकारण्याचा प्रयत्न करू; असे आश्वासन दिले.

# डॉ.हेडगेवार विद्यालयातील दहावी मधील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

करमाळा(सं.प्र.) : जे संघर्षावर मात करतात तेच जगाला नवी दिशा देतात; असे मत यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील यांनी व्यक्त केले.

गौंडरे येथील डॉ.हेडगेवार माध्य. विद्यालयातील दहावी मधील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ व गेल्या वर्षीच्या दहावी मधील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून श्री.करे-पाटील बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक भरत आवताडे, विस्तार अधिकारी सुग्रीव नीळ, केंद्रप्रमुख श्रीरामे सर, उद्योजक बंटी जाधव, सरपंच सुभाष हनपुडे, संस्थेचे अध्यक्ष उमराव बापू रणमोडे, माजी पोलीस पाटील देविदास पाटील, रयत शिक्षण संस्थेचे भोसले सर, कॉम्प्युटर इंजिनियर कृष्णा दौंड, राहुल शेळके आदी मान्यवर उपस्थित होते.


पुढे बोलताना ते म्हणाले, की जर तुमचं भविष्य उज्वल करायचं असेलतर चांगली संगत आणि मनाशी मोठं ध्येय ठेवा, यश तुम्हाला नक्की मिळेल. यावेळी करे-पाटील यांचे हस्ते दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांना रोख बक्षीसे देण्यात आली तसेच एनएमएमएस परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व गोल्ड मेडल वाटप करण्यात आले. यावेळी नववीतील विद्यार्थीनी यशश्री काळे, समीक्षा मुसळे, साक्षी करे यांनी दहावीच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. स्वामिनी कदम व आश्लेषा कदम यांनी शाळा व शिक्षक यांच्याबद्दल कृतघ्नता व्यक्त केली.


शिवसेना जिल्हाप्रमुख
सोलापूर जिल्हा नियोजन समितीचे सदस्य
श्री.महेशशेठ चिवटे
आपणांस वाढदिवसाच्या..
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
मेरगळ परिवार
हिवरवाडी



श्री.राजेंद्र मेरगळ (माजी सरपंच)

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर-बारामती-सोलापूर खुशखबर





बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
आता आपल्या करमाळ्यात !
उपलब्ध सुविधा...
● मुळव्याधवर इंजेक्शन ● डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब
● एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब
● संडासवाटे रक्त येणे, पु येणे ● संडासची जागा बाहेर पडणे
● संडास जागी खाज व आग होणे ● संडासाचा नागवेडा
● संडास नंतर बसण्यास त्रास होणे ● भगंदर, फिशर
● चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)
ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड
करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)
परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई



विशेष सुचना...
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
नाव नोंदणीसाठी संपर्क मो.9763035862
बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# नवभारत इंग्लीश स्कुलमध्ये मराठी दिन साजरा

करमाळा(सं.प्र.) : श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित नवभारत इंग्लीश मेडियम स्कुल मध्ये मराठी राजभाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या सर्वेसर्वा सुनिता देवी या होत्या. प्रत्येक वर्षी २७ फेब्रुवारी हा मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. ज्येष्ठ कवी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कुसुमाग्रज म्हणजेच विष्णू वामन शिरवाडकर यांचा जन्मदिवस राजभाषा दिन म्हणून साजरा केला जातो. मराठी भाषा ही संस्कृत भाषेतून बनलेली आहे. मराठी भाषा फुलासारखी कोमल आहे तर वेळप्रसंगी वज्राहूनही कठीण. यावेळी विद्यार्थ्यांनी मराठी भाषेविषयी मनोगत व्यक्त केले. बाल विद्यार्थ्यांनी सुंदर कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका मोहिते मॅडम यांनी केले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, कर्मचारी सह विद्यार्थी उपस्थित होते.



ॲड.कमलाकर वीर (मा.उपनगराध्यक्ष, करमाळा नगरपरिषद)

करमाळा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष व शिवसेना जिल्हाप्रमुख
मा.श्री. महेशशेठ चिवटे
आपणांस ७ मार्च रोजी असलेल्या
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..
शुभेच्छुक
श्री.अरूण(काका) जगताप
करमाळा, जि.सोलापूर


शिवसेनेचे जिल्हाप्रमुख
व सोलापूर जिल्हा नियोजन समितीचे सदस्य
मा.महेश नरसिंह चिवटे
7 मार्च
आपणांस वाढदिवसाच्या..
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
• प्रविण दत्तात्रय गायकवाड • अक्षय सुनील कांबळे [इंजि ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर]
करमाळा, जि.सोलापूर


3 मार्च
पुणे जिल्हा काँग्रेस (आय) चे उपाध्यक्ष
व करमाळा मुस्लिम समाजाचे अध्यक्ष
व आमचे मार्गदर्शक
हाजी उस्मानशेठ तांबोळी
आपणांस वाढदिवसाच्या लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
पैलवान ग्रुप, करमाळा.

## ईव्हीएम मशीनला विरोध करण्यासाठी

# माढा मतदार संघातून पाचशे व्यक्तींचे अर्ज दाखल करणार : श्री.जगताप



करमाळा(सं.प्र.): येणाऱ्या लोकसभेच्या माढा मतदार संघातून कमीत कमी पाचशे व्यक्तींचे उमेदवारी अर्ज लोकवर्गणी करून दाखल करणार असून, ते कोणत्याही परिस्थितीत बाद करता येणार नाहीत याची सुध्दा काळजी करून प्रत्येक लोकसभा मतदारसंघात ५०० ते १००० उमेदवाऱ्या दाखल करून ईव्हीएम मशीनला विरोध करावा; असे आवाहन काँग्रेस आय चे तालुका अध्यक्ष प्रतापराव जगताप यांनी केले.

याबाबत बोलताना श्री.जगताप म्हणाले, की आजपर्यंत या विरोधात अनेक आंदोलने झाली, मोर्चे निघाले पण याचा आयोगाला कसलाही फरक पडत नाही. सध्या देशातील लोकशाही वाचवण्यासाठी ईव्हीएम मशीन ऐवजी बॅलेट पेपरवर मतदान घेणे गरजेचे आहे. ममता बॅनर्जी यांनी तृणमुल काँग्रेसकडून सलग निवडणुका जिंकूनही त्यांनी ईव्हीएम मशीनवर मतदान घेणे ऐवजी बॅलेट पेपरवर मतदान घ्यावे; अशी मागणी केली. बिहार मधील आरजेडी पार्टी देखील सर्वात मोठी पार्टी असून त्यांचा देखील ईव्हीएम मशीनला विरोध आहे. इतकेच काय तर २००९ साली भाजपाने देखील ईव्हीएम मशीनवर मतदान नको म्हणून निवडणूक आयोगाकडे मागणी केली होती. वास्तविक पाहता ईव्हीएम मशीनवर जरी मतदान मोजण्यासाठी वेळ कमी लागत असलातरी पाच वर्षातून एकदा होणाऱ्या या निवडणुका खूप महत्वाच्या असतात. त्यामुळे मतमोजणीसाठी एखादा दुसरा दिवस जास्त लागला तरी काय फरक पडतो; असाही सवाल श्री.जगताप यांनी व्यक्त केला आहे.

बॅलेट पेपरवर मतदान करत असताना मतदान करणाऱ्याला स्वत: मतदान करून त्या मतपत्रिकेची घडी करून सर्व उमेदवार प्रतिनिधीच्या समोर स्वत: केलेले मतदान बॅलेट बॉक्समध्ये टाकता येते. याउलट ईव्हीएम मशीनवर जरी बटन दाबले तरी त्याच उमेदवाराला नक्की मतदान झाले की नाही हे शंकास्पद ठरते. त्यामुळे पूर्वीप्रमाणे देशात पुन्हा एकदा लोकशाही मजबुत करण्यासाठी बॅलेज पेपरवरच मतदान घेण्यात यावे; अशी मागणी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष प्रतापराव जगताप यांनी केली आहे.

# बाळासाहेब काळे यांना उद्यान पंडित पुरस्कार जाहीर

करमाळा (सं.प्र.) : कामोणे येथील प्रगतशील आवळा उत्पादक शेतकरी बाळासाहेब काळे यांना राज्य शासनाने उद्यान पंडित पुरस्कार जाहीर केला आहे. हा पुरस्कार नुकताच राज्याचे राज्यपाल रमेश भैस यांचे हस्ते देण्यात आला. दोन लाख रूपयाचा चेक, शाल व स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. बाळासाहेब काळे यांनी आठ एकर आवळा पिकातून ४३ लाख रुपयाचे उत्पन्न मिळवले आहे. जिरायत पट्ट्यात ठिबक सिंचनचा वापर करून त्यांनी उत्पन्न मिळवले आहे. विशेष म्हणजे शेततळ्यात साठवलेल्या पाण्याचा पुरेपूर विनीयोग करून त्यांनी पीक घेतल्याने हा पुरस्कार देण्यात आला. राज्याच्या कृषी संचालकाची कमिटी कामोणे येथे येऊन त्यांनी भेट देऊन गेले आहे. याबाबत काळे म्हणाले, की ग्रामीण भागात विशेष काम करायचे ठरवले होते. माझी आवळा या फळावर श्रध्दा असल्याने त्यावरच काम करण्याचे ठरवून मी आठ एकरात आवळा पीक घेतले. तसेच परिसरातील अनेक शेतकऱ्यांना लागवडीसाठी मी प्रवृत्त केले आहे. भविष्यात जास्तीत जास्त आवळा उत्पादक शेतकरी निर्माण करून आवळ्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प उभारणार आहे.

**घर जागा विकणे आहे**

करमाळा शहरातील मारवाड गल्ली येथील जैन स्थानक शेजारील ६५० स्क्वे.फुट स्लॅप बांधकाम असलेली घरजागा योग्य किंमतीत विकणे आहे.

• संपर्क : श्री.योगेश बोरा, मो.9763877650

**श्री गजानन अगरबत्ती**

- सुगंधी अगरबत्ती • कापूर
- अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
- विविध कलरची रांगोळी
- सर्व प्रकारचे लोबन,
- सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य

योग्य दरात मिळेल !



पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)




गाडी, युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामूक्त व्हा...
आता जून्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !

२ चाकी | ३ चाकी | ४ चाकी | ट्रक | ट्रॅक्टर | JCB | पोक्लेन | सोलर

एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस

**सुभद्रा पॉवर सोल्युशन्स**

प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे (मा.विस्तार अधिकारी, पंचायत समिती, करमाळा) 7588506719

शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड, करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

# श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांची पुण्यतिथी साजरी

करमाळा(सं.प्र.): येथील पांचाळ सोनार समाज संस्थेच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करून श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. येथील महामुनी मंगल कार्यालयात श्री संत शिरोमणी नरहरी महाराज विश्वकर्मा प्रतिमा व कालिका देवी शिरसंगी (कर्नाटक) यांच्या प्रतिमेची अनिल वाशिंबेकर, घोडके सर, पंडित गुरूजी, सुधाकर महामुनी, संतोष पोतदार, तानाजी महामुनी, शामलताई वाशिंबेकर यांचे हस्ते पुजन करण्यात आले. यावेळी ह.भ.प.विलास महाराज शिंदे (पोथरे) यांची किर्तन सेवा झाली. किर्तनाला हनुमान भजनी मंडळ पोथरे यांनी साथ दिली. किर्तनानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम झाला. यावेळी ग्रामीण भागातील सर्व पांचाळ सोनार समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनिल वाशिंबेकर, मंदार घोडके, सुधांशु घोडके, राजु पोतदार, हनुमंत दिक्षीत, रमेश महामुनी, सचिन महामुनी, गणेश वाशिंबेकर, सोहम वाशिंबेकर आदींनी परिश्रम घेतले. तानाजी महामुनी यांनी कार्यक्रमाची व अन्नदानाची जबाबदारी स्विकारून महामुनी मंगल कार्यालय उपलब्ध करनू दिले. त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. तरूणांचा उत्साह, ज्येष्ठाचे मार्गदर्शन यामुळे कार्यक्रम आनंदाने साजरा झाला.

# आदिनाथच्या निवडणुकीसाठी २२ लाख ५२ हजार रू. निवडणूक शाखेकडे वर्ग करण्याची प्रक्रिया सुरू

करमाळा(सं.प्र.) : आरसीसी कारवाई केल्यानंतर ऊस उत्पादक शेतकऱ्यांची देणे व इतर सरकारी देणे दिल्यानंतर राहिलेली २२ लाख ५२ हजार ५३ रुपये ही रक्कम आदिनाथ कारखान्याच्या निवडणुकीसाठी प्राधिकरणाकडे भरावी; असे लेखी पत्र प्रशासकीय संचालक मंडळांनी तहसीलदार यांचेकडे दिले होते. त्यानुसार ही रक्कम आयसीआयसी बँकेतून निवडणूक शाखेकडे वर्ग करण्याची प्रक्रिया सुरु झाली असल्याची माहिती प्रशासकीय संचालक महेश चिवटे, संजय गुटाळ यांनी दिली आहे.

आदिनाथ कारखान्याची २०१८-१९ मधील शेतकऱ्यांची देणे दिल्यानंतर २२ लाख रूपयांची रक्कम शिल्लक राहिली होती. ही रक्कम आता निवडणूक आयोगाकडे वर्ग होणार आहे. सहकारी संस्थांच्या निवडणूक ३१ मे पर्यंत स्थगित करण्याचे आदेश सहकार खात्याने दिल्यामुळे पुढील प्रक्रियेकडे सभासदांचे लक्ष लागून राहिले आहे. याबाबत बोलताना प्रशासकीय संचालक मंडळ अध्यक्ष बाळासाहेब बेंद्रे म्हणाले, की सहकार खात्याच्या आदेशानुसार व शासनाच्या निर्देशानुसार निवडणूक आयोगाकडे ही रक्कम भरण्याचे पत्र दिले असून तहसील खात्याने सुध्दा याला शिफारस करून ही रक्कम वर्ग करण्याच्या सूचना आयसीआयसीआय बँकेला दिले आहेत. मोलॅसिस विक्री झाल्यानंतर ऊस उत्पादक शेतकऱ्यांची राहिलेली सर्व देणे देण्यात येणार आहेत. त्याची प्रक्रियाही जोरात सुरु आहे. याबाबत महेश चिवटे म्हणाले, की आदिनाथ कारखान्याच्या दीडशे कोटी रूपयांच्या कर्ज प्रकरणाला महाराष्ट्र शासनाने थकहमी द्यावी अशी शिफारस सहकार आयुक्त यांनी शासनाकडे दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांचेकडे याबाबत पाठपुरावा सुरु आहे.

डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना **श्रीजय नेत्र रूग्णालय**

डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A

करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.

वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध

**श्रीजय ऑप्टिकल** (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)

श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३


पुणे शहर काँग्रेस आय चे उपाध्यक्ष
करमाळा मुस्लिम समाजाचे अध्यक्ष
हाजी उस्मानशेठ
हाजी हाशमोद्दीन तांबोळी
आपणांस दि.३ मार्च रोजी
असलेल्या वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
जय महाराष्ट्र मित्र मंडळ
जय महाराष्ट्र ना.सह.पतसंस्था मर्या.करमाळा


3 मार्च
मुस्लिम समाजाचे नेते व मंडळाचे मार्गदर्शक
हाजी उस्मानशेठ तांबोळी
आपणांस दि.३ मार्च रोजी असलेल्या
वाढदिवसास लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
रूपचंद तालीम तरूण मंडळ मंगळवार पेठ, करमाळा.

# भाजपा व्यापारी आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्ष पदी बाळासाहेब होसिंग

## अध्यात्मिक आघाडीच्या तालुका अध्यक्ष पदी दिनेश मडके



करमाळा(सं.प्र.) : भारतीय जनता पार्टी व्यापारी आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्ष पदी बाळासाहेब होसिंग यांची तर अध्यात्मिक आघाडीच्या तालुका अध्यक्ष पदी दिनेश मडके यांची निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र भाजपा कार्यालयात जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे यांचे हस्ते देण्यात आले.

बाळासाहेब होसिंग हे याआधी भाजपा उद्योग आघाडीचे करमाळा तालुका अध्यक्ष होते. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी पक्षाचे काम जोमाने केले होते. या कामाची दखल घेत त्यांना सोलापूर जिल्हा व्यापारी आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. भाजपा अध्यातिमक अघाडीचे तालुका अध्यक्ष दिनेश मडके हे अनेक वर्षापासून नाणीज पिठाचे शंकराचार्य नरेंद्र महाराज यांचे भक्ती संप्रदायाचे काम करत आहेत. या निवडीनंतर बाळासाहेब होसिंग म्हणाले, की भाजपा जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे यांचे नेतृत्वाखाली आपण व्यापारी आघाडी मार्फत व्यापारी बांधवांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणार आहे. दिनेश मडके यांनी भाजपा पक्ष आपल्या हिंदू धर्म संस्कृती रक्षणाचे काम करत आहेत. याला माझ्या कामाची जोड देऊन भाजपाची ताकद करमाळ्यात वाढवणार असल्याचे सांगितले. या निवडीप्रसंगी भाजपाचे तालुका अध्यक्ष रामभाऊ ढाणे, शहराध्यक्ष जगदीश आगरवाल, भाजपा ओबीसी जिल्हा उपाध्यक्ष नरेंद्र ठाकूर, उपसरपंच अमोल पवार, आजिनाथ सुरवसे, भैय्या कुंभार, संजय किरवे, महादेव गोसावी, गणेश गोसावी यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# राशीनपेठ अंतर्गत गटारी व डांबरीकरण कामाचा शुभारंभ

करमाळा(सं.प्र.): शहरातील विविध कामांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मोठ्या प्रमाणावर निधी देत असून ठेकेदारांनी मात्र चांगल्या दर्जाची कामे करून करमाळ्याच्या विकासात भर घालावी; असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी केले. करमाळा शहरातील राशीनपेठ येथील अंतर्गत गटारी व डांबरीकरण कामाच्या शुभारंभ प्रसंगी श्री.चिवटे बोलत होते. शहरातील राशिनपेठ येथे अंतर्गत गटारी बांधणे (३० लाख रू.) व रस्ता डांबरीकरण करणे (२० लाख रू.) या कामांचे भुमीपूजन माजी उपनगराध्यक्ष तथा राशीनपेठ तरूण सेवा मंडळाचे मार्गदर्शक सोमनाथ चिवटे यांचे हस्ते नारळ फोडून करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक ललित आगरवाल, प्रसिध्द व्यापारी नितीन शियाळ, रमेश भंडारे, उध्दव ओतारी, संतोष किरवे, मनोज किरवे, संतोष ओतारी, रमेश होरणे, राजेंद्र वाशिंबेकर, बंडू पारूडकर, देविदास चिवटे, उमेश आगरवाल, गणेश बागडे, संजय शिलवंत, उपजिल्हाप्रमुख अनिल पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# उमरड येथे एका रात्रीत शेतकऱ्यांच्या सहा विद्युत मोटारींची चोरी

करमाळा(सं.प्र.) : उमरड येथील उजनीधरण काठावर उमरड चरीमधील तब्बल सहा विद्युत मोटारींची वायर चोरट्यांनी चोरून नेली आहे. मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या या चोरीने शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. यात सुनील बदे, मनोहर बदे, दत्ता बदे, महादेव मिसाळ, सुरेश कोठावळे, तानाजी कोठावळे या शेतकऱ्यांची चोरी झाली आहे. धरणाच्या फुगवट्यावर असलेल्या उमरडच्या शेतकऱ्यांना मोठ्या कष्टाने पाणी मिळवावे लागते. पीके वाचवण्यासाठी दोन-तीन मोटार व पाईपलाईन करून शेत बागायत करावे लागते. मात्र वायरची चोरी झाल्याने शेतकरी भयभीत झाले आहेत. तरी पोलीस प्रशासनाने यात लक्ष घालून चोरांचा बंदोबस्त करावा; अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

डॉ.राऊत
Advanced dental Clinic & Root Canal Center
दातांचा दवाखाना

उपलब्ध सुविधा...
- इंटराओरल कॅमेराद्वारे तपासणी
- डिजीटल एक्स-रे
- अत्याधुनिक यंत्रणेद्वारे रूट कॅनल ट्रिटमेंट
- वेदनारहित दात व दाढ काढणे
- पडलेले दात बसविणे
- दात साफ करणे
- दाताच्या रंगाचे सिमेंट भरणे/चांदी भरणे

डॉ.कौस्तुभ काशिनाथ राऊत
बी.डी.एस.
(डेन्टल सर्जन)

उपलब्ध सुविधा...
- स्क्रुच्या सहाय्याने दात बसविणे (डेंटल इम्प्लांट)
- अक्कलदाढ काढणे
- वेडेवाकडे पुढे आलेले दात सरळ करणे
- अंशत: किंवा पूर्ण कवळी बसवणे
- हिरड्यांच्या रोगासाठी ट्रिटमेंट
- कॉस्मेटिक ट्रिटमेंट
- कर्करोगाचे निदान
- गरजेनुसार तज्ञ डॉक्टरांच्या भेटी

महात्मा गांधी शाळेच्या पाठीमागे, पुणे रोड, करमाळा. (मो.9552134186)

# भारतीय जनता पार्टी तर्फे 'गाव चलो अभियान'



करमाळा(सं.प्र.): ५१ टक्केहून अधिक मतदान होण्यासाठी भारतीय जनता पार्टीने गाव चलो अभियान राबविले आहे. या अभियानांतर्गत खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांनी करमाळा मुक्कामी राहून शहरी व ग्रामीण भागात मोदी की गॅरंटीच नारा गावोगावी पोहोचविला. २६ फेब्रुवारीला भाजपाचे शहराध्यक्ष जगदीश आगरवाल यांच्या निवासस्थानी पत्रकार परिषद घेऊन मतदार संघातील या अभियानाचा आढावा मांडला. यावेळी ते म्हणाले, की गाव चलो अभियानांतर्गत मतदार संघात फिरून मतदारांशी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधून शासकीय योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांचीही भेट घेतली. शासकीय कार्यालये आणि शाळांना भेटी देऊन तेथील अडचणी समजून घेतल्या. तसेच शहिदांचे कुटूंबिय, जुने भाजपा कार्यकर्ते, नामांकित खेळाडू, महिला बचत गट, शासनाच्या विविध योजनांचे लाभार्थी, सामाजिक कार्यकर्ते आदी २४ सामान्य कुटूंबांना भेट देऊन त्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.

पक्षाच्या उमेदवारीबाबत बोलताना उमेदवारी कोणालाही दिली तरी पक्षाचे काम जोमाने करणार असल्याची ग्वाही दिली. रिटेवाडी उपसासिंचन आणि मांगी तलावाचा कुकडी लाभक्षेत्रात समावेश याबाबत महायुतीचे सर्व पक्ष प्रयत्नशील असून केंद्र सरकारच्या वेबकॉस कंपनीकडून फेर जलनियोजनाच्या सर्वेचे काम सुरू आहे. कृष्णा खोरे विकास महामंडळाला त्याचा अहवाल आल्यानंतर या योजना लवकरच मार्गी लागतील; असा निर्वाळा त्यांनी दिला. तसेच करमाळा आगारास ३० ग्रीन बसेस मिळण्याबाबत मुख्यमंत्री यांचेकडे मागणी केली आहे; असेही खासदार नाईकनिंबाळकर यांनी सांगितले. तसेच करमाळ्यातून जाणारा जेऊर-चौंडी-आष्टी रेल्वे मार्ग येत्या पंचवार्षिक मध्ये पूर्ण करण्याचा शब्द त्यांनी दिला आहे.

तोच विश्वास, तीच सेवा
आनंद ड्रायफ्रुटस् & गरम मसाला
प्रोप्रा : अमोल र. हिरण
मो.9270496867, 7057258385
Anand Dryfruit

- खास उन्हाळ्याकरीता...
थंडाई बोटल, ताक मसाला, कोकम सरबत, आवळा कँडी, वाळा सरबत, रसना, सब्जा बी, वाळा जुडी, रोझ सिरप, आईस्क्रिम पावडर, खडीसाखर, प्रवाळयुक्त गुलकंद, पापड आटा पापड मसाला, पापड खार, मोहरी डाळ, मेथी,लोणचे मसाले...

उत्कृष्ट कंपनीचे व क्वॉलिटीचे ड्रायफ्रुट

केक भांडी, चॉकलेट क्रंची, टर्निंग टेबल नोजल रशियन आईस्क्रिमचे सर्व साहित्य तसेच केक व वाढदिवस डेकोरेशन सजावट साहित्य मिळेल !

एकवेळ अवश्य भेट द्या..!

एच.यु.गुगळे कापड दुकान समोर, मेनरोड, करमाळा.

मेहेर आय & डेंटल हॉस्पिटल
नगर येथील डोळ्याची खोबणी, नेत्र प्लास्टिक शस्त्रक्रिया व तिरळेपणा विशेष तज्ञ
डॉ.विमल राजपुत MBBS, MS Ophthalmology Fellow Paediatric Ophthalmology and Oculoplasty

रविवार दि.३/३/२०२४ रोजी करमाळा शहरात येणार आहेत.

नगर येथील **डॉ.विमल राजपुत** हे डोळ्यांची पापणी खाली पडणे,पापण्यांची दुर्धरता, अश्रुनलिका व अश्रुग्रंथी संबंधित विकार, डोळ्यांना झालेले आजार, डोळ्यांचा कर्करोग, पापण्यांना आलेली गाठ, बालरोग,नेत्ररोग आणि उपचार इ. विकारांवरील उपचारासंबंधीत तज्ञ असून ते दि.३/३/२०२४ रोजी सकाळी ९ वाजता उपस्थित राहुन रूग्णांची नेत्र तपासणी व उपचार करणार आहेत.

अधिक माहिती व नांवनोंदणीसाठी संपर्क : मो.+91 7875619696

पत्ता : शिंदे ॲक्सिडेंट हॉस्पिटल जवळ, शाहुनगर, करमाळा.


शिवसेना
शिवसेना
शिवसेना सोलापूर जिल्हाप्रमुख
सोलापूर जिल्हा नियोजन समिती सदस्य
कमलादेवी औद्यो.वसाहतीचे चेअरमन
श्री.महेश(दादा) चिवटे
आपणांस वाढदिवसाच्या लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा...
7 मार्च
शुभेच्छुक
श्री.दिपक पाटणे
शिवसेना वैद्यकिय मदत कक्षप्रमुख
करमाळा., जि.सोलापूर


7 March
श्री कमलादेवी औद्योगिक वसाहतीचे चेअरमन
शिवसेनेचे जिल्हाप्रमुख
गणेश विटूकडे
मा.महेश नरसिंह चिवटे
आपणांस वाढदिवसाच्या...
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
हॉटेल स्वराज
हॉटेल संतोष
प्रोप्रा : विटूकडे बंधू, करमाळा


7 मार्च
श्री.अजित रणदिवे
मा.संचालक, मकाई कारखाना
मा.उपसरपंच, रामवाडी
सोलापूर जिल्हा नियोजन समितीचे सदस्य
शिवसेनेचे सोलापूर जिल्हाप्रमुख व पत्रकार संघाचे अध्यक्ष
श्री.महेशशेठ चिवटे यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
रणदिवे परिवार रामवाडी, ता.करमाळा.


7 मार्च
श्री कमलादेवी औद्योगिक
वसाहतीचे चेअरमन व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख
श्री.महेश नरसिंह चिवटे
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
श्री.अशोक चव्हाण व परिवार, श्रीदेवीचामाळ


माजी नगरसेवक
उद्योजक
उद्योजक
मुस्लिम समाजाचे नेते
पुणे शहर काँग्रेस आय चे उपाध्यक्ष व
करमाळा तालुका मुस्लिम समाजाचे अध्यक्ष
व आमच्या मंडळाचे मार्गदर्शक
मा.हाजी उस्मानशेठ तांबोळी
यांना दि.३ मार्च रोजी असलेल्या वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
मुस्लिम समाज करमाळा शहर

# साडे येथील १९ वर्षाच्या युवकाचा खून

करमाळा(सं.प्र.) : साडे येथील १९ वर्षाच्या युवकाचा खून झाला आहे. हा प्रकार २४ फेब्रुवारी रोजी घडला आहे. यात बालिका राजु काळे (रा.साडे ) या महिलेने फिर्याद दिली आहे. त्यात तिने म्हटले आहे, की माझा भाऊ रोहित काळे (वय-१९) हा साडे येथील घरातून सायंकाळी ४ वाजता गावातून येतो म्हणून गेला तो परत आला नाही. त्याचा शोध घेत असताना दुसऱ्या दिवशी (ता.२५) तो सौंदे हद्दीत सापडला आहे. त्याच्या डोक्याला गंभीर जखम झाली होती. ही बाब पोलीसांना कळवली. पोलीसांनी त्याला ॲम्ब्युलन्स मधून दवाखान्यात आणले. त्यावेळी डॉक्टरांनी तो मयत झाल्याचे सांगितले. त्याचा कोणीतरी अज्ञात व्यक्तीने खून केला आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक पोपट टिळेकर हे करत आहेत.


# कोंबडी खत मिळेल



हिवरवाडी येथील आमच्या EC पोल्ट्री मधील उत्तम असे कोंबडी खत आपल्या शेतातील फळबाग व इतर घटकासाठी अत्यंत उपयुक्त असलेले कोंबडी खत योग्य दरात उपलब्ध आहे, आजच संपर्क करा !

गोविंद नामदेव पवार
Mob: 9922576750
Mob: 8983790191

संपर्क : गोदावरी EC पोल्ट्री फार्म, हिवरवाडी


# जुन्या भांडणाचा रोष मनात ठेवून महिलेस मारहाण

करमाळा(सं.प्र.) : घरासोमरील बोअरचे पाणी देण्यास विरोध केल्याच्या कारणावरून झालेल्या भांडणाचा रोष मनात ठेवून दाम्पत्याने महिलेस मारहाण केली आहे. हा प्रकार वांगी नं.२ येथे २३ फेब्रुवारी रोजी सकाळी सात वाजता घडला आहे. यात स्वाती रविंद्र क्षीरसागर (रा.वांगी नं.२) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले, की २२ फेब्रुवारीला माझे पतीने घरासमोरील बोअरमधील बंद पडलेली मोटार दुरूस्त करून आणली व ती चालू केली. त्यावेळी माझे दीर शिवकुमार क्षीरसागर म्हणाले, की मला बोअरचे पाणी पाहिजे. त्यावेळी माझे पतीने शेतात केलेल्या खर्चाची मागणी केली. त्याचा राग आला व माझे दीर भांडण करून गेले. त्यानंतर २३ फेब्रुवारीला सकाळी सात वाजता मी दारात झाडत असताना माझे दीर शिवकुमार हे मला शिवीगाळ करू लागले. त्यांना शिव्या देऊ नका.. असे म्हणाले असता त्यांनी चाकूने माझ्या डोक्यात मारले तसेच खाली पडलेला गज घेऊन माझ्या डोक्यात मारला. तसेच माझी जावू अस्मिता हिने बॅटने माझ्या पाठीत मारले. त्यानंतर उपचारासाठी शासकीय रूग्णालयात आले. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विनायक माहुरकर हे करत आहेत.

# पांडे येथे जुगार खेळणाऱ्या आठ जणाविरूध्द कारवाई

## दीड लाख रूपयाचा ऐवज जप्त

करमाळा(सं.प्र.) : पांडे येथे जुगार खेळणाऱ्या आठ जणाविरूध्द पोलीसांनी कारवाई केली असून त्यांच्याकडून १ लाख ५२ हजार ८४५ रूपयाचा ऐवज जप्त केला आहे. हा प्रकार २३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४.३० वाजता घडला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल शेखर शहाजी बागल यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले,की पांडे येथे काही लोक जुगार खेळत असल्याची माहिती समजल्यावर आम्ही तिथे छापा टाकला असता, तिथे सतीश बळीराम दुधे, किसन मधुकर भोसले, सुभाष मुरलीधर भोसले (सर्व रा.पांडे ) हे जागेवर सापडले तर रमेश तुकाराम मोहोळकर, रफिक जाफर पठाण, ईलाही कमूलाल मुलाणी,भाऊराव शेवराव भोसले व वेताळ उर्फ काबूल रामदास लांडगे (सर्व रा.पांडे) हे पळून गेले. ते सर्वजण पत्याच्या पानावर पैसे लावून जुगार खेळत होते. त्यांच्याकडे जुगाराचे साहित्य, रोख रक्कम २ हजार ८४० रूपये व दीड लाख रूपयाच्या तीन मोटारसायकली सापडल्या आहेत. असा एकूण त्यांच्याकडून १ लाख ५२ हजार ८४५ रूपयाचा ऐवज सापडला आहे.

या प्रकरणी पोलीसांनी या आठजणाविरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विनायक माहुरकर हे करत आहेत.

# देवळाली येथील वैद वस्ती जि.प.प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

करमाळा(सं.प्र.) : देवळाली येथील वैद वस्ती जि.प.प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. यावेळी शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थीनंनी विविध पारंपारिक तसेच देशभक्तीपर गीतातून समुह नृत्य तसेच नाटीकेतून समाजप्रबोधनपर संदेश दिला. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाविष्कारांना त्यांनी पुरेपूर दाद देऊन कौतूक केले. यावेळी करे-पाटील यांनी शाळेला एक स्मार्ट टीव्ही भेट दिला तसेच शाळेच्या विकासासाठी सर्वांनी सहयोग देण्याचे आवाहन केले.








करमाळा शहर व तालुका मुस्लिम समाजाचे मार्गदर्शक, अध्यक्ष व आधारस्तंभ

मा.हाजी उस्मानशेठ तांबोळी

आपणांस दि.३ मार्च रोजी असलेल्या..

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...



शुभेच्छुक

सरकार मित्र मंडळ

करमाळा, जि.सोलापूर

पुनम एजन्सी

अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक

• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स • प्लंबींग • हार्डवेअर

स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट

होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल

प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.




हार्दिक अभिनंदन
डॉ.संवाद वामन खडकीकर (M.B.B.S) हे
फॉरेन मेडिकल Graduate Examination उत्तीर्ण झाल्याबद्दल
तसेच डॉ.आदित्य सुनील अडसुळ हे M.B.B.S
झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
गवळी परिवार, करमाळा
कमलाई लॅब, गाळा नं.१५, जीन मैदान, पुणे रोड, करमाळा


7 March
श्री कमलादेवी औद्योगिक वसाहतीचे
चेअरमन व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख
श्री.महेश चिवटे
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा..
शुभेच्छुक
सहयोग कृषी सेवा केंद्र
वाशिंबे, ता.करमाळा.
प्रोप्रा निलेश नंदकुमार खानवरे (९८६०५००३२१)
निलेश खानवरे


7 मार्च
शिवसेनेचे जिल्हाप्रमुख
सोलापूर जिल्हा नियोजन
समितीचे सदस्य,
श्री कमलादेवी औद्योगिक
वसाहतीचे चेअरमन
मा.महेशशेठ
चिवटे
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
खासदार
शिवसेना वैद्यकिय मदत कक्षप्रमुख
मुख्यमंत्री, म.राज्य
कार्यकारी संचालक, भैरवनाथ शुगर
शिवसेना शहरप्रमुख
श्री.किरण सावंत
श्री.संजय शिलवंत
श्री.गौतम भालेराव
शुभेच्छुक
ॲड.शिरीषकुमार लोणकर (नोटरी, म.राज्य)
● प्रवक्ता – शिवसेना करमाळा तालुका ●विश्वस्त– कमलादेवी ट्रस्ट
● सल्लागार – भैरवनाथ शुगर ● सल्लागार – जयवंत मल्टीपरपज सोसा.
● सल्लागार – आदिनाथ स.सा.कारखाना
ॲड.लोणकर नोटरी ऑफिस-करमाळा. (९८५०६८१७९४)
ॲड.शिरीषकुमार लोणकर
(शिवसेना करमाळा तालुका प्रवक्ता)
सौ.निर्मला शिरीषकुमार लोणकर
(माजी नगरसेविका)

# उमेद ने उमेद दिली त्यामुळे उंच भरारी मारता आली : उषा आढाव



करमाळा(सं.प्र.) : 'कोशीश करनेवालोंकी कभी हार नही होती' असे जे म्हटले आहे त्याची प्रचिती पोथरे येथे आली आहे. शेतात काम करणारी व टेलरींग करणारी युवती बचत गटाच्या मार्गदर्शना-खाली चक्क उद्योजिका झाली असून, त्यांनी निर्माण केलेला पापड चक्क मोठमोठ्या शहरात भाव मारून जात आहे.

पोथरे येथील सौ.उषा बाबूराव आढाव यांचे माहेर व सासर पोथरे हेच आहे. त्यांचे दहावी पर्यंतचे शिक्षण झाले की लग्न झाले. त्यावेळी त्या सासरच्या शेतीत काम करत होत्या, जोडीला टेलरंगीचेही काम करत होत्या. सन २००६ ते २०१९ पर्यंत त्या घर आणि शेती एवढेच काम करत होत्या. दरम्यान सन २०१९ ला उमेदचे अधिकारी योगेश जगताप तसेच मनोज बोबडे या अधिकाऱ्यांनी गावात बैठक घेतली. त्यावेळी त्यांनी सौ.आढाव यांना सामुदायिक संसाधन व्यक्ती (आय.सी.आर.पी.) म्हणून नेमले. त्यानंतर त्यांनी त्यांचा प्रवास मांडला.

त्या म्हणाल्या, की मी गावात बचत गटाचे काम सुरू केले. माझे सोबत अन्य आय.सी.आर.पी. यांनीही मदत केली व त्यातून बचत गट वाढत गेले. सुरुवातील २९ बचत गट होते. हळूहळू बचतगट वाढत गेले व पोथरे येथे चक्क ६४ बचत गट कार्यरत आहेत. प्रत्येक बचत गटातून वेगवेगळे व्यवसाय सुरु आहेत. कोणी किराणा दुकाण, कांडप केंद्र, पिठाची गिरणी, सेंद्रीय शेती असे उद्योग सुरू केले. या बचत गटांना फिरता निधी तसेच काही गटांना सामुदायीक गुंतवणूक निधी मिळाला आहे. हे काम करता करता मी अनुभव घेऊन स्वत:चा उद्योग सुरू करण्याचे ठरवले.

माझे पती बाबुराव आढाव यांनी पाठबळ तर दिलेच पण आर्थिक सहाय्यकव आवश्यक तेथे कामाला मदत केल्याने अमृता महिला गृहउद्योग उभा राहिला व त्यातुनच 'अमृता पापड' ची निर्मिती झाली आहे. सध्या आमच्या या उद्योगात आमचा परिवार तसेच काही महिला भगिणींना सुध्दा येथे काम मिळते. राज्यातील मोठमोठ्या शहरात अमृता पापडचे नाव झाले ही बाब महत्वाची आहे.




उमेदने उमेद दिली म्हणूनच मला उंच भरारी मारता आली व आज पुणे, मुंबई मार्केटमध्ये अमृता पापडचे नाव झाले आहे. आम्ही उडीद पापड, उडीद-मुग पापड, मुग पापड, तांदुळ पापड, मका पापड, नाचणी पापड, शेवई, नुडल्स् असे वेगवेगळे पापड बनवत असून ते पुणे, मुंबई, स्थानिक व्यवसायिक यांना विक्री करतो. आमच्याकडे वजनकाटा, पॅकींग मशीन, पीठ मळणी यंत्र, गिरणी, लादी बनविण्याचे यंत्र तसेच पापड करण्याचे यंत्र आहेत. याशिवाय छोटा हत्ती माल वाहतुकीसाठी घेतला असून आमचा माल थेट पुणे मार्केटला जातो. कष्ट केल्यानंतर व कामात गुणवत्ता असल्यानंतर बाजारात माल विकला जातो.

**...उषा आढाव**
**(अमृत गृहउद्योग, पोथरे)**
**मो.९९६०२५५८४८**

# महाराष्ट्र केसरी पै.बालारफी कडून पैलवान इराणी घिस्सा डावावर चितपट





करमाळा(सं.प्र.) : करमाळा येथे हनुमान जयंतीचे औचित्य साधून करमाळा कुस्तीगीर संघटनेच्या वतीने भरविण्यात आलेल्या कुस्ती मैदानात ५० रू. पासून ते ३ लाखापर्यंतच्या कुस्त्या झाल्या. यामध्ये भारत देश व परदेशातील सुमारे ३०० पैलवानांनी सहभाग नोंदविला; अशी माहिती कुस्ती मैदानाचे आयोजक पै.सुनीलबापू सावंत यांनी दिली.

कुस्ती आखाडाचे पुजन पै.सुरेश शिंदे, पै.अफसर जाधव, पै.भाऊसाहेब खरात यांचे हस्ते झाले. शेवटची कुस्ती माणचे अभयसिंह जगताप, धनराज शिंदे यांचे हस्ते महाराष्ट्र केसरी पैलवान बालारफी शेख व इराणचा पैलवादी हादी इराणी यांची कुस्ती लावण्यात आली. यावेळी पंच म्हणून महाराष्ट्र केसरी पै.चंद्रहास निमगिरे, उपमहाराष्ट्र केसरी पै.अतुल पाटील, पै.सुरेश शिंदे, पै.अफसर जाधव, पै.राजु भैय्या शेख, पै.आयुब शेख, पै.बाळासाहेब पडघम आदी जणांनी पंच म्हणून काम केले. यावेळी नंबर एकची कुस्ती रात्री दहा वाजता सुरू झाली. महाराष्ट्र केसरी पैलवान बालारफी शेख विरूध्द इराणचा पैलवान हादी इराणी यांच्यात ही कुस्ती अटीतटीने झाली. या लढतीत इराणचा पैलवान हादी इराणी यांच्यावर घिस्सा डावावर हजारो कुस्तीप्रेमींच्या साक्षीने चितपट करून पैलवान शेख यांनी विजय मिळवला. त्याचप्रमाणे पैलवान पृथ्वीराज पाटील विरूध्द पैलवान प्रकाश बनकर ही कुस्ती गुणावर पै.पृथ्वीराज पाटील यांनी जिंकली. तर पै.भारत मदने विरूध्द इराणचा पै.महादी इराणी यांची प्रेक्षणीय कुस्ती होऊन यामध्ये पै.भारत मदने विजय मिळवला. या कुस्ती मैदानात अत्यंत आकर्षक व कुस्ती प्रेमीच्या डोळ्याचे पारणे फेडणारी कुस्ती नेपाळचा सुप्रसिध्द पैलवान देवा थापा विरूध्द पैलवान अमित लाखा ही कुस्ती झाली. यामध्ये देवा थापा याने विजय मिळवला. या मैदानात महाराष्ट्र चॅम्पीयन पै.अनिल जाधव, करमाळेकरांचा लाडका पैलवान शाहरूख खान यांनी प्रतिस्पर्धीवर मात करून विजय मिळवला.

यावेळी माणचे अभयसिंह जगताप, माजी पंचायत समिती सदस्य धनराज शिंदे, भैरवनाथ शुगरचे किरण सावंत, तहसीलदार शिल्पाताई ठोकडे, पोलीस निरीक्षक विनोद घुगे, डॉ.तानाजीभाऊ जाधव, पैलवान अस्लम काझी, उपमहाराष्ट्र केसरी अतुल पाटील, माजी सभापती शेखर गाडे, पंचायत समितीचे माजी सदस्य ॲड.राहुल सावंत, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे, माजी उपनगराध्यक्ष दादासाहेब सावंत, माजी नगरसेवक संजय सावंत, अल्ताफशेठ तांबोळी, फारूक जमादार, दिनेश भांडवलकर, चंद्रकांत काळे, विकास गलांडे, विजय लावंड, अमोल यादव यांचेसह कुस्तीप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे कुस्ती मैदान यशस्वी करण्यासाठी कुस्तीगीर संघटनेचे प्रमुख सुनील सावंत, दादासाहेब इंदलकर, सचिन गायकवाड, नानासाहेब मोरे, पिल्लू इंदलकर, श्रीकांत ढवळे, गणेश सावंत, गणेश आडसुळ, आयुब शेख, सुरेश शिंदे, भाऊसाहेब खरात, वामन पठाडे यांनी परिश्रम घेतले.


आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर



रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.



मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

JK Design Studio
आर्किटेक्ट | इंजिनियर्स | इंटेरियर
• आर्किटेक्चर ड्रॉईंग अँन्ड डिझाईन (वास्तुशास्त्रनूसार)
• रेसिडेंशियल, कमर्शियल, इंडस्ट्रियल
• स्टील डिझाईन
• बिल्डिंग परवाना
• इंटेरियर डिझाईन
• बिल्डिंग कन्स्ट्रक्शन
• लॅन्डस्केप डिझाईन
• कन्सल्टन्सी




पत्ता २६९०/३३९ गणेशनगर, करमाळा.
jkdesignstudio23@gmail.com
Jk_design_studio23
Er.Irshad M. Kazi (B.E.Civil) Mo.8421124858
Ar.Junaid M. Kazi (B.Arch) Mo.9975579996

लक्ष्मीकांत देवी (9421063525, 8805633525)
श्रीजी इस्टेट एजन्सी
• घरजागा, दुकान जागा
• प्लॉट व बंगले
• जमीन बिनशेती करणे
• व्यवहार करून दिले जातील
• सरकारी दस्तऐवजची कागदपत्र घरपोहोच केली जातील.
पत्ता : मेनरोड, करमाळा.


7 मार्च
शिवसेनेचे जिल्हाप्रमुख, पत्रकार संघाचे
अध्यक्ष व आमच्या संस्थेचे चेअरमन
श्री.महेशशेठ चिवटे
यांना वाढदिवसानिमित्त..
हार्दिक शुभेच्छा..
व्हा.चेअरमन
सचिव
श्री.शहा
नासीर कबीर
शुभेच्छुक
श्री कमलादेवी औद्योगिक सह.वसाहत मर्या; करमाळा.
सर्व संचालक व कर्मचारी वृंद


खासदार
शिवसेना वैद्यकिय मदत कक्षप्रमुख
मुख्यमंत्री, म.राज्य
मा.श्री.श्रीकांत शिंदे
श्री.मंगेश चिवटे
शिवसेनेचे सोलापूर जिल्हाप्रमुख
सोलापूर जिल्हा नियोजन समितीचे सदस्य
श्री कमलादेवी औद्योगिक वसाहतीचे चेअरमन
मा.महेशशेठ चिवटे
आपणांस वाढदिवसाच्या..
हार्दिक शुभेच्छा
7 मार्च
शुभेच्छुक
शैलेश खडके
(इंजि. अँन्ड कॉन्ट्रॅक्टर)
शिवाजीनगर, करमाळा

# तालुकास्तरीय काव्य वाचन स्पर्धेत धन्वंतरी काळे प्रथम



करमाळा (सं.प्र.): येथील करमाळा साहित्य मंडळ व ग्रामसुधार समिती यांचे वतीने मराठी राजभाषा दिनानिमित्त आयोजित केलेल्या तालुकास्तरीय खुल्या काव्यवाचन स्पर्धेत धन्वंतरी काळे यांचा प्रथम क्रमांक आला आहे. या स्पर्धा करमाळा शहरातील महादेव मंदिरा समोरील जयवंतराव जगताप बहुउद्देशीय सभागृहात संपन्न झाल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीराम प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश चिवटे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते श्रेणिकशेठ खाटेर, माजी प्राचार्य नागेश माने, ॲड.अपर्णा पदमाळे व ग्रामसुधार समितीचे उपाध्यक्ष नाथाजीराव शिंदे हे उपस्थित होते.

या स्पर्धेत २० स्पर्धकांनी भाग घेतला होता. त्यामध्ये द्वितीय क्रमांक संदीप हुलगे, तृतीय क्रमांक चारू देवकर, उत्तेजनार्थ क्रमांक प्रतिमा काटूळे व प्रा.शितल वाघमारे

> काव्य स्पर्धा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी असून अशा उपक्रमासाठी आम्ही सदैव तुमच्या पाठीशी उभा राहू.
> **..गणेश चिवटे (अध्यक्ष, श्रीराम प्रतिष्ठान)**

> साहित्य मंडळ व ग्रामसुधार समितीने हा अतिशय सुंदर असा कार्यक्रम घडवला. अशा कार्यक्रमाची निश्चितच गरज आहे. यातूनच उत्तम कवी घडतील.
> **...प्राचार्य नागेश माने**

> तालुकास्तरीय काव्यवाचन स्पर्धेत गुणवत्ता दिसून आली. यापुढे जिल्हास्तरीय स्पर्धा घ्या, आम्ही तुमच्या सोबत आहोत.
> **...श्रेणिकशेठ खाटेर (सामाजिक कार्यकर्ते)**

यांना देण्यात आला. या स्पर्धेसाठी गणेश चिवटे यांनी १० हजार रूपये देणगी दिली होती. त्यापैकी ५ हजार रू. चे प्रथम बक्षीस व संयोजनासाठी ५ हजार रू. दिले होते. द्वितीय बक्षीस श्रेणिकशेठ खाटेर यांनी ३००० रू. तेजीबाई व पन्नालाल खाटेर यांचे स्मरणार्थ दिले होते. तृतीय बक्षीस प्रा.नागेश माने यांनी २००० रू. सोनल माने यांचे स्मरणार्थ तर उत्तेजनार्थ बक्षीस संदेश परिवाराकडून १००० रू. तुकाराम हिरडे गुरूजी यांचे स्मरणार्थ व नाथाजीराव शिंदे यांनी १००० रू. यशोदाबाई व विठोबा शिंदे यांचे स्मरणार्थ दिले होते.

उपस्थितांचे स्वागत ज्येष्ठ कवी प्रकाश लावंड, अनिल माने, तेजस धेंडे, बाळासाहेब गोरे, संतोष कांबळे, राजेंद्र साने यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.ॲड.बाबूराव हिरडे यांनी केले. सुत्रसंचालन डॉ.सुनिता दोशी यांनी केले.

या स्पर्धेचे परिक्षण ज्येष्ठ कवी प्रकाश लावंड, नवनाथ खरात व खलील शेख यांनी केले. यावेळी कवी दादासाहेब पिसे, नवनाथ खरात, खलील शेख, तेजस धेंडे, संतोष कांबळे यांनी आपल्या कविता सादर केल्या. आभार कवी खलील शेख यांनी मानले.

# महेश चिवटे यांच्या वाढदिवसानिमित्त नागरी सत्कार, मोफत आरोग्य शिबीर



करमाळा(सं.प्र.) : सोलापूर जिल्हा नियोजन समितीचे सदस्य व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांचा वाढदिवसानिमित्त ७ मार्चला खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांचे हस्ते व सांगोल्याचे आमदार शहाजीबापू पाटील यांचे अध्यक्षतेखाली भव्य जाहीर नागरी सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी शिवसेनेच्या प्रवक्त्या ज्योतीताई वाघमारे, शिवसेना वैद्यकिय मदत कक्षप्रमुख मंगेश चिवटे, उद्योजक श्रीकांत पवार (मुंबई), पंढरीनाथ साटपे (मुंबई), रामभाऊ पवार (पुणे), राणा शिपींग कंपनीचे चेअरमन राणा सुर्यवंशी आदी मान्यवरांसह भैरवनाथ शुगरचे कार्यकारी संचालक किरण सावंत, शिवसेना संपर्कप्रमुख संजय कोकाटे (माढा), मनिष काळजे (सोलापूर), महेश साठे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष केदार सावंत, जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे, विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, जिल्हापरिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड, माजी नगरसेवक अल्ताफशेठ तांबोळी आदी उपस्थित राहणार आहेत. श्री.चिवटे यांचा नागरी सत्कार ७ मार्चला सकाळी ११ वाजता होणार असून यावेळी सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत मोफत आरोग्य शिबीर व चष्मा वाटप शिबीर होणार आहे. तसेच ६ मार्चला ह.भ.प.योगिताताई डोंबाळे (डोंबाळवाडीकर) यांचे सायंकाळी सात ते दहा किर्तन होणार असून ७ मार्चला ह.भ.प.विनोद भुजंग रोकडे (कोळगावकर) यांचे किर्तन होणार आहे. हे सर्व कार्यक्रम अमरनाथ टॉवर, श्रीदेवीचामाळ रोड, करमाळा. येथे होणार आहे. तरी या कार्यक्रमास नागरीकांनी उपस्थित रहावे; असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# मकाईने १३ मार्च पूर्वी थकीत ऊस बिल देऊन शेतकरी सभासदांना न्याय द्यावा : प्रा.रामदास झोळ



करमाळा(सं.प्र.): मकाई सहकारी साखर कारखान्याचे थकीत ऊस बिल मकाईचे संस्थापक स्व.दिगंबरराव बागल मामा यांचे १३ मार्च जयंतीपूर्वी देऊन शेतकरी सभासदांना न्याय मिळवून द्यावा; असे मत प्रा.रामदास झोळ यांनी व्यक्त केले.

मकाई कारखान्याचे मागील वर्षाचे थकीत ऊस बिल मिळण्यासाठी माजी चेअरमन दिग्विजय बागल यांच्या घरावर मोर्चा काढण्यात येणार होता. बारावीची परीक्षा असल्याने यशवंतराव चव्हाण महाविद्यालय परिसरामध्ये माजी चेअरमन यांचा बंगला असल्याने तसेच जमावबंदी आदेश असल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून हनुमान मंदिर, सावंतगल्ली करमाळा येथेच मकाईचे सभासद शेतकरी यांची सभा संपन्न झाली. याप्रसंगी दशरथ कांबळे, ॲड.राहुल सावंत, शहाजी माने, रविंद्र गोडगे, हरिदास मोरे, राजेश गायकवाड, सुदर्शन शेळके, दिपक शिंदे आदी मान्यवरांची भाषणे झाली. सोलापूर जिल्ह्यातील भीमा टाकळी सहकारी साखर कारखाना, शंकर सहकारी साखर कारखाना यांनी मदत केली. त्याप्रमाणे मकाई कारखान्याचे बँकेचे प्रकरण मार्गी लावून पैसे मिळवून देऊन करमाळा तालुक्यातील शेतकऱ्याला न्याय मिळवून द्यावा; अशी मागणी प्रा.रामदास झोळ यांनी केली. यावेळी शेतकरी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते

# खासदार निधीतून किल्ला विभाग येथे दोन ठिकाणी एलईडी दिवे

करमाळा(सं.प्र.) : भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष शंभुराजे जगताप यांच्या प्रयत्नातून व मार्गदर्शनाखाली भाजपा युवा मोर्चाचे शहराध्यक्ष प्रफुल्ल शिंदे यांनी खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांच्या खासदार निधीतून किल्ला विभाग येथे दोन ठिकाणी एलईडी दिवे मंजूर करून आणले. या एलईडी दिव्याचे उद्घाटन खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांचे हस्ते झाले. यावेळी शंभुराजे जगताप, जिल्हा उपाध्यक्ष शशिकांत पवार, तालुका अध्यक्ष चंद्रकांत राखुंडे, योगेश सोरटे, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस ओंकार घोंगडे, शहर उपाध्यक्ष वनराज घोलप, प्रशांत पवार, मारुती मंदिरचे पुजारी सचिन काळे, रोहित काळे, करण काळे, प्रशांत शिंदे, अक्षय शेळके, वासुदेव डोके, बबलू पठाण, शुभम राऊत आदी उपस्थित होते.

**नगर अर्बन को-ऑप बँक लि; (मल्टि-स्टेट शेड्युल्ड) अहमदनगर**
अवसायानांतर्गत
बँक रोड, पोस्ट बॉक्स नं.७, अहमदनगर- ४१४००१
फोन : ०२४१-२३४३६४१, २३४३६४२, २४१७८०४-०७

**बँकेचे जुने फर्निचर, लॉकर, कॅबिनेट दरवाजे व इलेक्ट्रीक/इलेक्ट्रॉनिक व अनुशंगीक वस्तू(Dead Stock) विकणेबाबत**

नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या अहमदनगर जिल्ह्यातील बंद होणाऱ्या शाखा कार्यालयातील (Dead Stock) वस्तू विकणेबाबत इच्छुकांनी संबंधित शाखेच्या शाखाधिकारी यांच्याशी संपर्क करून कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष पाहणी करावी. बंद होणाऱ्या शाखा आणि संबंधित शाखेचे शाखाधिकारी यांची माहिती खालील तक्त्यात नमूद केली आहे.

| बंद होणाऱ्या शाखेचे नाव | शाखाधिकाऱ्यांचे नाव | शाखाधिकाऱ्यांचे मोबाईल नंबर |
|---|---|---|
| करमाळा | श्री.एस.एस.महामुनी | ९६८९२७१५२२ |

दि.७/३/२०२४ पर्यंत कोटेशन सील बंद लिफाफ्यात मा.अवसायक नगर अर्बन को.ऑप बँक लि;(मल्टि-स्टेट शेड्युल्ड) अहमदनगर अवसायानांतर्गत प्रधान कार्यालय, पोस्ट बॉक्स नं.७, अहमदनगर-४१४००१ यांना कार्यालयीन कामकाजाचे वेळेत पाठवावेत. कोटेशन स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व हक्क अवसायक यांनी राखून ठेवले आहेत. विहित मुदतीत योग्य निविदा न आल्यास त्याबाबत पुढील निर्णय घेणेचे सर्व अधिकार मा.अवसायक यांना राहतील.

दि.२८/२/२०२४

**अवसायक**
**नगर अर्बन को.ऑप बँक लि;(मल्टि-स्टेट शेड्युल्ड) अहमदनगर**
**अवसायानांतर्गत**

**ॲड.प्रियाल ल. अग्रवाल**
ऑफिस नं.१०, दिवाणी न्यायालय समोर
विद्यानगर, करमाळा., जि.सोलापूर
मो.९७६६३३६६७७

## सावधानतेची नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, मौजे जेऊर, ता.करमाळा, जि.सोलापूर येथील क.गट नं.२२७/१ पैकी, क्षेत्र – ०० हे. ९४ आर, आकार – ०० रू. १५ पैसे तसेच डि.सोलापूर, ता.करमाळा पैकी मौजे जेऊरवाडी हद्दीतील शेतजमीन मिळकत क.ग.नं.१५०/२ पैकी क्षेत्र – ०१ हे. ७५ आर, आकार – ०२ रू. ८४ पैसे. या मिळकती मध्ये आमचे अशिल नामे सौ.नंदा सुरेश लोंढे यांचा हक्क, अधिकार व हितसंबंध असून तसा आमचे अशिलांचा सदर मिळकतीबाबत करार देखील झालेला होता व आहे. सदर मिळकतीबाबत तिऱ्हाईत इसमांनी हेतुपुरस्कर हस्तांतरीत व्यवहार करून पुढे त्या अकृषिक करून त्याचे प्लॉट्स तयार करून ते विक्री करण्याचे प्रयत्नात असलेबाबत आमचे अशिलांना खात्रीलायक माहिति असल्याने आमचे अशिलांनी सदर मिळकतीबाबत मे.करमाळा येथील सि.ज.सि.डि.सो यांचे कोर्टात स्पे.मु.नं.८७०/२०२३ अन्वये साठेखतावरून ताब्यासह खरेदीखत करून मिळणेसाठी आणि जाहीर ठरावासाठी दावा दाखल केलेला असून तो अद्यापपावेतो प्रलंबित आहे. अशा परिस्थितीमध्ये सदर मिळकतीमध्ये वर नमूद दाव्यातील प्रतिवादींनी मिळकत ही अकृषिक करून तिचे प्लॉटींग पाडून विक्री केलेस सदर मिळकतीमधील प्लॉट्स विकत घेणारे लोकांना देखील कायदेशीर बाबींना सामोरे जावे लागेल. तसेच यदाकदाचित आमचे अशिलांना दाव्यामध्ये यश आलेस प्लॉट्स खरेदीधारकांना त्यांचा मालकी हक्क जाणार आहे व इतर स्वरूपाचे नुकसान होणार आहे. सबब गाव मौजे जेऊर व आजुबाजूचे परिसरातील लोकांची फसगत होऊ नये, सबब सदरच्या नोटीसीने तमाम लोकांस सावध करणेकरीता प्रस्तुतची सावधानतेची जाहीर नोटीस आमचे अशिलांना देणे भाग पडत आहे. सदरची नोटीस जाहीर होऊन देखील कोणी वर नमूद मिळकतीमध्ये कुठल्याही प्रकारचा व्यवहार केलेस तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली. ता.२८/०२/२०२४

**अशिला तर्फे ॲडव्होकेट**

## हमाल-तोलार कामगार संघटनेचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

करमाळा(सं.प्र.) : माथाडी कायदा संपुष्टात आणणारे परिपत्रक मागे घ्या.. अशा विविध मागण्यांसाठी जिल्हाध्यक्ष शिवाजी शिंदे, उपाध्यक्ष ॲड.राहुल सावंत, सुरेश बागल, भिमा सिताफळे, गोरख जगताप, दत्ता मुरूमकर यांचे नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. यावेळी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य व हमाल पंचायतचे अध्यक्ष ॲड.राहुल सावंत म्हणाले, की सोलापूर शहर व जिल्ह्यातील विविध हमाल–तोलार कामगार संघटनेच्या वतीने राज्य हमाल मापाडी महामंडळाचे अध्यक्ष व कामगार नेते डॉ.बाबा आढाव, आ.नरेंद्र पाटील व इतर कामगार संघटनेचे नेते यांनी मुंबई येथील आझाद मैदानावर माथाडी कायदा वाचवण्यासाठी व माथाडी कायदा सुधारण्याच्या नावाने आणलेले विधेयक हे माथाडी कामगार विरोधी असल्याकारणाने ते तात्काळ रद्द करण्याबाबत व कामगारांचे विविध मागण्यांसाठी आमरण उपोषण सुरू केले आहे. त्या आंदोलनास पाठींबा देण्यासाठी करमाळा तालुक्यासह जिल्ह्यातील व सोलापूर शहरातील हमाल–तोलार कामगार यांनी एक दिवस कामकाज बंद ठेवून सोलापूर येथे मोर्चात सहभागी झाले होते. या मोर्चात करमाळा तालुक्यातील हमाल–तोलार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## करमाळा नगरपरिषद, करमाळा

### जाहीर आवाहन

करमाळा शहर व तालुक्यातील सर्व आस्थापना तसेच नागरीकांना कळविण्यात येते की.. करमाळा नगरपरिषदेचे अग्निशमन वाहन तांत्रिक दुरूस्तीकरीता सोलापूर येथील फायर सर्व्हीस स्टेशन येथे पाठविण्यात आलेले आहे. सदर अग्निशमन वाहनाची दुरूस्ती होण्यासाठी अंदाजे २० दिवसाचा कालावधी लागेल. तरी आपण आप्तकालीन परिस्थितीमध्ये कुर्डूवाडी नगरपरिषद, कुर्डूवाडी यांचे अग्निशमन वाहन करीता भ्रमणध्वनी क्र.९४२३३२९५१० या क्रमांकावर संपर्क साधावा व सहकार्य करावे; ही विनंती !

**मुख्याधिकारी**
**(करमाळा नगरपरिषद करमाळा.)**

## बी.के.मॉल भाड्याने देणे आहे

करमाळा बायपास चौकातील (कृष्णाजीनगर) नवीन बांधकाम असलेला सुसज्ज हॉल, बँक, फायनान्स कंपनी, दवाखाना, किराणा दुकान किंवा मॉल इ. साठी उपयुक्त असा २००० स्क्वे. फुट हॉल भाड्याने देणे आहे



**संपर्क : मो.9922647662, 8308251111**

## करमाळा भूषण पुरस्कार डॉ.प्रदीप आवटे यांना जाहीर

### १० मार्चला खातगाव येथे पुरस्काराचे वितरण





करमाळा(सं.प्र.) : येथील ग्रामसुधार समितीचा सन्मानाचा करमाळा भूषण पुरस्कार यावर्षी आरोग्य अधिकारी कवी व लेखक डॉ.प्रदीप आवटे यांना जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे वितरण उजनी परिसरात खातगाव येथील रणसिंग फार्मवर सकाळी साडेअकरा वाजता होणार आहे. यावेळी जास्तीत जास्त नागरीकांनी उपस्थित रहावे; असे आवाहन ग्रामसुधार समितीचे संचालक राजेंद्र रणसिंग, संस्थेचे उपाध्यक्ष नाथाजीराव शिंदे, सचिव डी.जी.पाखरे यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे प्रशासक कुंदन भोळे, महाराष्ट्र राज्य डिजीटल मिडीया संघटनेचे अध्यक्ष राजा माने उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामसुधार समितीचे ॲड.डॉ.बाबूराव हिरडे हे राहणार आहेत. कार्यक्रमात कु.नम्रता रणसिंग (अधिक्षक – वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, म.शासन) यांचा तसेच आदर्श युवा किर्तनकार ह.भ.प.लक्ष्मण महाराज झेंडे यांचाही सत्कार करण्यात येणार आहे.

डॉ.प्रदीप आवटे हे राज्याच्या आरोग्य विभागात सहाय्यक संचालक म्हणून नागपूर येथे कार्यरत आहेत.१९९३ ते २००५ या कालावधीत ते कोर्टी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपजिल्हा रूग्णालय करमाळा येथे वैद्यकिय अधिकारी म्हणून कार्यरत होते. २००९ ते २०२२ या काळात साथरोग नियंत्रण विभागाचे राज्य सर्व्हेक्षण अधिकारी होते. तसेच २००६ ते २००९ या कालावधीत जागतिक आरोग्य संघटनेच्या पोलिओ निर्मुलन कार्यक्रमात उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश व गुजरात येथे कार्यरत होते. आंतरराष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेत हनोई, व्हिएतनाम येथे ते भारताचे प्रतिनिधी म्हणून सहभागी झाले होते. तसेच आंतरराष्ट्रीय परिषदेत तुर्कस्तान येते सहभागी झाले होते. सन १९९७ साली उत्कृष्ट ग्रामीण आरोग्यसेवेबद्दल राज्यशासनाचे मानपत्रही त्यांना मिळाले आहे. याशिवाय त्यांचे माझ्या आभाळाची गोष्ट, धम्मधारा व या अनाम शहरात हे कवितासंग्रह प्रसिध्द झाले असून जग्गुभैय्या जिंदाबाद.., जादु की झमकी.., आणखी एक स्वल्पविराम.., नवा भुगोल घडवू.. आणि सेंट–पर्सेट आजचे न्यायालय हे बालसाहित्य तसेच अडीच अक्षराची गोष्ट व विंडोसीट हे ललित ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. याशिवाय अनेक दैनिकातून व नियतकालिकातून त्यांचे लिखाण प्रसिध्द आहे. एक उत्साही आणि सर्वसामान्यात मिसळणारे व्यक्तीमत्व म्हणून त्यांची ओळख आहे.

## रोडटच प्लॉट विकणे आहे

नागोबा मंदिराजवळ रोडटच साडेचार गुंठे प्लॉट योग्य किंमत आल्यास विकणे आहे. तसेच जामखेड रोडवरील रोडटच गॅस गोडावून जवळील ३०X११० साईजचा प्लॉट विकणे आहे

**संपर्क : 9011355389**


3 मार्च
माजी नगरसेवक
युवा नेतृत्व
पुणे जिल्हा काँग्रेस(आय) चे उपाध्यक्ष व करमाळा मुस्लिम समाजाचे अध्यक्ष व आमचे मार्गदर्शक
हाजी उस्मानशेठ तांबोळी
आपको जन्मदिन मुबारक हो..।
मुन्नाशेठ काझी
हाजी आतिकभाई बेग
हाजी सादीकभाई शेख
शुभेच्छुक
सहारा डेव्हलपर्स
पुणे रोड, करमाळा.
9423334951
9423336928


7 मार्च
शिवसेनेचे सोलापूर जिल्हाप्रमुख
सोलापूर जिल्हा नियोजन समितीचे सदस्य
श्री कमलादेवी औद्योगिक वसाहतीचे चेअरमन
करमाळा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष
श्री.महेश नरसिंह चिवटे
आपणांस वाढदिवसाच्या लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा...
शिवसेना
शुभेच्छुक
क्रेंटा केमिकल
सृष्टी
उत्पादक : • वॉटर सोल्युबल फर्टीलायझर्स • दुय्यम सुक्ष्म अन्नद्रव्ये • पिक संवर्धके
• बायो प्रोडक्टस्-निबोळी, प्रोम, झाईम • सर्व प्रकारचे प्रोडक्टस्
प्लॉट नं; ए-७ एम आय डी सी टेंभूर्णी, - 413211,ता. माढा, जि. सोलापूर.
मो. ९४२१९६०७७७/९६५७७१६४०१. PH-02183-232207
www.crentachemical.com, E-Mail. cropcare@crentachemical.com

## अन्यायाविरूध्द लढणारे हजरजबाबी व धडाकेबाज नेतृत्व

# उस्मानशेठ तांबोळी



करमाळा शहर व तालुक्यातील मुस्लिम समाजाचे आधारस्तंभ उस्मानशेठ तांबोळी यांनी समाजकारणातून राजकारणामध्ये वाटचाल ठेवून उद्योग व्यवसायात मोठी आघाडी घेतली आहे. करमाळा शहर व तालुक्यातील मुस्लिम समाजाचे अनेक प्रश्न सोडवून त्यांनी समाजाला एकजुट बनविण्याचे प्रयत्न केले आहेत. एवढेच नाहीतर कोणावर अन्याय होत असेलतर तेवढ्याच ताकदीने ते उभा राहून त्याला न्याय मिळवून देण्याचे काम तांबोळी यांनी केले आहे. एक धडाकेबाज, हजरजबाबी व्यक्तीमत्व म्हणून तांबोळी यांचेकडे पाहिले जाते. मुस्लिम समाजाबरोबर अन्य समाजाचेही प्रश्न तांबोळी यांनी सोडविले आहेत.

करमाळा तालुक्यात सर्वच राजकीय नेत्यांबरोबर तांबोळी यांचे संबंध राहिले आहेत. अनेक नेत्याबरोबर त्यांचा चांगल्या कामासाठी संघर्षही झाला आहे. पण त्यांनी कोणासमोरही हात परसले नाहीत किंवा लोटांगण घेतले नाही. करमाळा नगरपरिषदेच्या निवडणुकीत त्यांनी स्वत:च्या ताकदीवर आपले बंधू अल्ताफशेठ तांबोळी यांना दोन वेळा नगरसेवक पदावर बसविले आहे.

करमाळा शहरातील मंगळवारपेठ मधील रूपचंद तालीम तरूण मंडळा मार्फत त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत. वडील कै. हाजी हाशमोद्दीन तांबोळी यांचे आशिर्वादाने त्यांनी शहरात अनेक व्यवसाय उभे केले. पुढे त्यांनी पुणे येथे स्थायिक होऊन तेथे आपल्या व्यवसायाचा चांगला जम बसविला आहे. पुणे जिल्हा काँग्रेस(आय) चे ते सध्या उपाध्यक्ष आहेत.

व्यवसायाबरोबर राजकारणातही त्यांना अनेक मोठ्या नेतेमंडळीबरोबर काम करण्याची संधी मिळाली आहे. करमाळ्यातून ओळखीचे कोणी काही काम घेऊन गेले तर त्याचे काम पूर्णत्वास नेल्याशिवाय ते स्वस्थ बसत नाहीत. उलट पुणे येथे काही अडचणी आल्यातर त्या आवर्जुन सांगत जावा; असे ते नेहमी सांगतात. त्यांच्या सामाजिक, राजकीय व व्यवसायाच्या कामात त्यांचे बंधू अल्ताफशेठ तांबोळी यांचे त्यांना नेहमी पाठबळ असते. अन्यायाविरूध्द लढले पाहिजे, उठाव केला पाहिजे; असे ते नेहमी म्हणतात. देशातील सध्याच्या राजकीय स्थितीबाबत त्यांनी खंत व्यक्त केली असून देश गुलामगिरीच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे त्यांचे मत आहे.

तांबोळी यांना सामाजिक कामाची जास्त आवड आहे. वडील हाजी हाशमोद्दीन तांबोळी यांचे नावाने त्यांनी ट्रस्ट स्थापन केला असून, गरीब रूग्णांसाठी रूग्णवाहिका घेतली आहे. या रूग्णवाहिकेचा वापर ते फक्त समाजासाठीच करत नसून सर्व जाती धर्माच्या लोकांसाठी त्यांनी सेवा उपलब्ध केली आहे. जात हा विषय त्यांचेसमोर गौण असून फक्त समाजापुरते काम न करता या समाजातील सर्व लोक भारतीय आहेत व त्या भारतीयांचा मला अभिमान असून त्यांचे मी काहीतरी देणे लागतो; या विचारातून ते सामाजिक काम करत आहेत. जातीभेद न ठेवता सर्व जातीधर्मातील लग्न सोहळे करण्याचा त्यांचा मानस आहे. यापूर्वीही त्यांनी वधू-वर परिचय मेळावा घेतला होता. आत्तापर्यंत ज्यांना आई-वडील नाहीत अशा मुलींची लग्ने त्यांनी स्वखर्चाने केली आहेत. समाजामधील मुले अशिक्षित राहू नये व समाज शिक्षित व्हावा; यासाठी त्यांनी ट्रस्ट मार्फत गरीब विद्यार्थ्यांचा संपूर्ण शिक्षणाचा खर्च करण्याचा मनोदय व्यक्त केला आहे. जो व्यक्ती गोरगरीबांसाठी झटतो, काम करतो त्यांना तांबोळी यांचा पाठींबा असतो. मग तो कोणत्याही पक्ष किंवा पार्टीचा असो. सामाजिक कामात ते कोणतेही राजकारण आणत नाहीत. नेहमी अन्यायाविरूध्द लढण्याची त्यांची भुमिका आहे. अन्याय करणार नाही व कोणावर करू देणार नाही; हे त्यांचे ब्रीद वाक्य आहे.

पंढरपूर यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांना ते दरवर्षी फराळाचे वाटप करतात. तसेच गुजरात येथील एका दिंडी सोहळ्याची मुक्कामाची व जेवणाची सुविधा त्यांचेकडे असते.तसेच रमजान ईदच्या काळातही मुस्लिम समाजाला ते मोफत दुधाचे वाटप करतात. मुकबधीर शाळेत टी-शर्ट व स्पोर्टस् चे किट वाटप, मदरसा शाळेतील विद्यार्थ्यांना चादर व स्वेटर वाटप, रमजान ईद निमित्त विविध साहित्याचे वाटप, दिवाळीत हिंदु समाजातील नागरीकांना फराळाचे वाटप तसेच मुस्लिम समाजातील नागरीकांसाठी मोफत खतना कॅम्प शिबीराचे आयोजन श्री.तांबोळी करतात.

कोरोनाच्या काळात करमाळा शहरातील नागरीकांना श्री.तांबोळी यांनी सर्वात जास्त मदत केली आहे. या काळात सर्व समाजातील गोरगरीबांना मोफत धान्य वाटप केले असून सॅनिटायझर, हॅन्डवॉश वाटप केले आहे. तसेच हजारो मास्कचे वाटपही केले आहे. तसेच किराणा मालाचे कीटही वाटप केले आहे.

राजकारणाबरोबर समाजकारणात ही श्री.तांबोळी यांनी आघाडी घेतली आहे. आपण जेवढे कमवतो, त्यातील थोडातरी हिस्सा समाजसेवेसाठी ते खर्च करतात. समाजात पैशावाले भरपूर आहेत, पण ते समाजासाठी खर्च व वेळ देतील; अशी माणसे बोटावर मोजण्या एवढीच सापडतील त्यात तांबोळी यांचा समावेश आहे. त्यांचा स्वभाव कडक आणि तेवढाच शांत आहे. समजुतीने काही प्रश्न मिटत नसतीलतर जशास तसे उत्तर देण्याचीही ताकद त्यांचेकडे आहे. त्यामुळे त्यांचे नेतृत्व हे सर्वांना आपलेसे वाटत आहे. अशा या व्यक्तीमत्वाचा ३ मार्च २०२४ रोजी वाढदिवस आहे. त्यांना वाढदिवसा-निमित्त हार्दिक शुभेच्छा..!

***

**...अफरोज पठाण, करमाळा.**







सो.जि.नियोजन समितीचे सदस्य व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख
मा.श्री.महेशशेठ नरसिंह चिवटे
आपणांस वाढदिवसाच्या लाख.. लाख.. हार्दिक शुभेच्छा..
श्री.सोमनाथ चिवटे
माजी उपनगराध्यक्ष/अध्यक्ष - श्री कमलादेवी देवस्थान ट्रस्ट
शुभेच्छुक
• बनशंकरी मोबाईल शॉपी
• बनशंकरी किराणा
राशिनपेठ, करमाळा, जि.सोलापूर.


श्रीकांत शिंदे साहेब
खासदार
मंगेश चिवटे
मुख्यमंत्री आरोग्य सहायता निधी कक्ष प्रमुख
ना.एकनाथ शिंदे साहेब
मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य
शिवसेना जिल्हाप्रमुख सोलापूर
श्री. महेश चिवटे (पत्रकार)
वाढदिवसाच्या आभाळभर शुभेच्छा....
मा.श्री.राजेंद्र मेरगळ
मा.श्री.मिलिंद चव्हाण
मा.श्री.नागेश चेंडगे
मा.श्री.प्रदिप बनसोडे
शुभेच्छुक
मा.श्री.संजय जगताप
मा.श्री.सिध्देश्वर ढास
श्री.आजिनाथ इरकर
मा.श्री.केशव साळुंखे
शिवसेना वैद्यकिय मदत कक्ष व डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशन


श्री कमलादेवी औद्योगिक वसाहतीचे चेअरमन व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख
श्री.महेशशेठ चिवटे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
महेश चिवटे मित्र मंडळ
करमाळा, जि.सोलापूर


श्री कमलादेवी औद्योगिक वसाहतीचे चेअरमन व सोलापूर जिल्हा शिवसेनेचे प्रमुख
मा.महेश नरसिंह चिवटे
यांना वाढदिवसानिमित्त लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा
7 March
शिवसेना शाखाप्रमुख, हिवरवाडी
श्री.आजिनाथ महादेव इरकर
शुभेच्छुक
न्यु.पाटील मोबाईल शॉपी, भाजी मंडई जवळ, करमाळा.
प्रोप्रा : महेश आजिनाथ इरकर
मो.७०२०३७६१५१

# शहिद नवनाथ गात पुरस्कार जीवनाला कलाटणी देणारा पुरस्कार - तहसीलदार शिल्पा ठोकडे

करमाळा(सं.प्र.) : शहिद नवनाथ गात हा पुरस्कार जीवनाला कलाटणी देणारा पुरस्कार असून या पुरस्काराने कार्यकर्त्याच्या कार्याचे सार्थक होते. त्यामुळे ज्यांना हा पुरस्कार मिळाले ते निश्चितच कर्तृत्ववान आहेत. त्यांची यापुढे आणखी जबाबदारी वाढलेली आहे; असे मत तहसीलदार शिल्पाताई ठोकडे यांनी व्यक्त केले.

वरकुटे येथे शहिद जवान नवनाथ गात यांचे २१ व्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित केलेल्या रक्तदान शिबीर व पुरस्कार सोहळ्यात प्रमुख पाहूणे म्हणून त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष ॲड.डॉ.बाबुराव हिरडे हे होते. यावेळी व्यासपीठावर यशकल्याणी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, गटविकास अधिकारी मनोज राऊत, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अनिरूध्द कांबळे, देविदास ताकमोगे सर, जनता सहकारी बँकेचे चेअरमन दिलीप तळेकर, आजी-माजी सैनिक संघटनेचे तालुका अध्यक्ष आक्रुड शिंदे यांचेसह सत्कारमुर्ती गजेंद्र पोळ, शहिद जवान भारत कांबळे यांच्या पत्नी संगीता कांबळे, कुस्तीपटू कु.काजल जाधव, प्रा.डॉ.अश्विनी अशोक भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.




पुढे बोलताना श्रीमती ठोकडे म्हणाल्या, की हा पुरस्कार सन २०१४ मध्ये मला मिळाला होता. त्यावेळी मला स्विकारण्यासाठी येता आले नाही. परंतु आज तो पुरस्कार माझ्या हस्ते वितरीत होत आहे, हे माझे भाग्य आहे. सुरूवातीला हा पुरस्कार मला जाहीर झाला आणि त्यानंतर तब्बल २०० पुरस्कार मला मिळाले आहेत. या सर्व पुरस्कारात शहिद जवान नवनाथ गात या पुरस्काराचे मोल हे सर्वांपेक्षा वेगळे आहे.

यावेळी आजी-माजी सैनिक संघटनेचे आक्रुड शिंदे, यशकल्याणी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, गटविकास अधिकारी मनोज राऊत, क्षीतिज ग्रुप तर्फे डॉ.सुनिता दोशी, सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार विजेते गजेंद्र पोळ तसेच डॉ.प्रा.अश्विनी भोसले व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.ॲड.हिरडे यांची भाषणे झाली.

यावेळी करमाळा येथील सामाजिक काम करणाऱ्या क्षीतिज ग्रुपला सामाजिक क्षेत्रातील सांघिक पुरस्कार देण्यात आला. यावेळी क्षीतिज ग्रुपच्या सर्व सदस्या उपस्थित होत्या. गजेंद्र पोळ तसेच श्रीमती संगीता कांबळे, कु.काजल जाधव, जि.प.शाळा खातगाव, निलेश भोसले, अक्षय शिंदे, अनिल माने, रत्नदीप जगदाळे, रोहिदास शिंदे, डॉ.प्रा.अश्विनी भोसले या सर्वांना पुरस्कार देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्मारक समितीचे सचिव निळकंठ ताकमोगे यांनी केले तर सुत्रसंचालन सचिन गाडेकर यांनी केले. आभार नागन्नाथ गात यांनी मानले.

सकाळी नऊ वाजता स्मारक समितीच्या वतीने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी ८५ जणांनी रक्तदान केले. त्यानंतर ह.भ.प.गहिणीनाथ महाराज खेडकर यांचे किर्तन झाले.

# राजेरावरंभा शेतकरी प्रोड्युसर कंपनीचा अभ्यास दौरा सपन्न

करमाळा(सं.प्र.) : महाराष्ट्र शासन कृषी विभाग, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) व राजेरावरंभा शेतकरी प्रोड्युसर कंपनी लि; करमाळा यांचे संयुक्त विद्यमाने शेतकरी सभासदांचा दोन दिवसीय शेतकरी अभ्यास दौरा व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या अभ्यास दौऱ्यात करमाळा तालुक्यातील सौंदे, गुळसडी, सरपडोह, शेलगाव क, चिखलठाण व तरटगाव येथील ११५ महिला-पुरूष शेतकरी सभासदांनी सहभाग नोंदवला. दोन दिवसाच्या अभ्यास दौऱ्यात शेतकऱ्यांनी राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठातील सुरू असणारे नाविन्यपूर्ण प्रयोग पाहिले. विद्यापीठांतर्गत वेगवेगळ्या विभागांना भेटी देऊन त्यांची माहिती जाणून घेतली. या विद्यापीठातील सिंचन व्यवस्थापन विभाग, अवजारे विभाग, भाजीपाला, फळबाग, नर्सरी, डेअरी फार्म,नवीन वाण संशोधन केंद्र असे वेगवेगळे विभाग जवळपास ३२ एकर क्षेत्रावर काम करत आहेत, याची माहिती शेतकऱ्यांनी घेतली. दुसऱ्या दिवशी शेतकऱ्यांनी सह्याद्री फार्म नाशिकला भेट दिली. कंपनीतील फार्मर फॅकल्टी सेंटर, माती संशोधन केंद्र, प्रक्रिया उद्योग, केळी टिशू कल्चर लॅब यांना भेट देऊन माहिती जाणून घेतली. पाणी फाउंडेशनने सह्याद्री कंपनीवरती बनवलेला माहितीपट सभागृहांमध्ये सर्व शेतकऱ्यांनी पाहिला. याच सभागृहात कंपनीचे अध्यक्ष विलास शिंदे यांनी उपस्थित सर्व शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.







पंतप्रधान
उपमुख्यमंत्री
खासदार
शिवसेना संपर्कप्रमुख, म.रा.
खासदार
शिवसेना वैद्यकिय मदत कक्षप्रमुख
शिवसेना सचिव
आमदार, सांगोला
शिवसेना प्रवक्त्या
शिवसेना सहसंपर्क नेते
शिवसेना ता. संपर्क
राजा का बेटा राजा नही होगा,
जो काम करेगा वही राजा होगा ।
मा.एकनाथ शिंदे (मुख्यमंत्री)
शिवसेना जिल्हाप्रमुख व सोलापूर जिल्हा नियोजन समिती सदस्य
मा.श्री.महेश(दादा) चिवटे
यांचे वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा !
जाहीर नागरी सत्कार
दि.७ मार्च, सकाळी ११ वा.
स्नेहभोजन
दुपारी १.०० ते ४.००
मोफत आरोग्य शिबीर
सकाळी १० ते सायं. ५ पर्यंत
● स्थळ : अमरनाथ टॉवर, श्रीदेवीचामाळ रोड, करमाळा., जि.सोलापूर
शिवसेना करमाळा विधानसभा


आई व आण्णा
8 March
तुम्हाला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !
आज आईने ८० तर आण्णांनी ८४ वर्षाची आयुष्याची किमया पार केली. गुरूशिवाय कोणतेही जीवन साकार होत नाही. जेव्हा गुरूंचा हात डोक्यावर असतो तेव्हा जीवनाला आकार मिळतो.
तुम्ही गुरू म्हणून अनेकांच्या जीवनाची रूपरेखा आखलीत आणि कुटूंबाची नाळ मायेच्या धाग्याने घट्ट जोडून ठेवलीत !
तुमच्या वाढदिवसाचे हे सुखदायी क्षण तुम्हाला सदैव आनंददायी ठेवत राहो ! आणि या दिवसाच्या अनमोल आठवणी तुमच्या हृदयात सतत तेवत राहो.! तुम्ही घडवलेली आणि तुमच्या संस्काराची वात सतत अंगी रूजवून मनापासून प्रेम करणाऱ्या तुमच्या प्रियजनांकडून मनापासून वाढदिवसानिमित्त अनेकोत्तम शुभेच्छा !
तुमची साथ आणि आशिर्वाद सदैव आमच्यासोबत असाच कायम राहो..!
श्री.पंडित यशवंत घाडगे(गुरूजी)
(माजी तालुका मास्तर)
उपाध्यक्ष, सेवानिवृत्त शिक्षक संघटना करमाळा
मा.चेअरमन, क.ता.प्राथ.शिक्षक पतसंस्था
सौ.स्नेहलता पंडित घाडगे(बाई)
(माजी मुख्याध्यापिका)
शुभेच्छुक
मुले : श्री.सुहास पंडित घाडगे (सौ.राजश्री सुहास घाडगे). श्री.अतुल पंडित घाडगे (सौ.स्मिता अतुल घाडगे)
नातवंडे : आर्या अतुल घाडगे, रोहित सुहास घाडगे, स्वरीत अतुल घाडगे
मुली : सौ.उज्वला उत्तम कदम (श्री.उत्तम देवराव कदम). सौ.विद्या अविनाश कचरे (श्री.अविनाश रघुनाथ कचरे)
नातू : चि.अक्षय कदम, श्री.ऋषिकेश कचरे (सौ.ऋतुजा ऋषिकेश कचरे).
नाती : सौ.प्राची अनिरूध्द पाटील (श्री.अनिरूध्द पाटील). सौ.प्रांजली विक्रम भोसले (श्री.विक्रम भोसले),
सौ.सिध्दी स्वप्नील कदम (श्री.स्वप्नील कदम), कु.प्रिया कदम (देवश्री, शिवेंद्र, शांभवी, रूही), चंद्रभागा कांडेकर, भोसले, ढवण, जाधव, पवार परिवार
सौजन्य
आर्या लेडीज शॉपी
जेऊर, ता.करमाळा